रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ४
www.ramprahar.com

रविवार, २१ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




**मुंबई : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २३व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी झाला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका नीरजा, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी मान्यवरांचे स्वागत केले.** (वृत्त उद्याच्या अंकात)

# चांदा ते बांदा जोरदार पाऊस

## जनजीवन विस्कळीत



**नागपूर, मुंबई, सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून राज्याच्या जवळपास सर्व भागांत पावसाने हजेरी लावली आहे. नागपूरसह विदर्भाला शनिवारी (दि. २०) मुसळधार पावसाने झोडपून काढले, तर दुसरीकडे मुंबईसह कोकणातही जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

विदर्भाकडे पाठ फिरवलेला मोसमी पाऊस पुन्हा एकदा तेथे दाखल झाला आहे. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने नागपूरमध्ये दाणादाण उडवली. शहरातील काही भागांत पाणी शिरले होते. याशिवाय गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, अमरावती, अकोला, वाशिम येथेही पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. त्यामुळे नदी, नाले वाहू लागले. काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी येऊन वाहतूक ठप्प झाली. चंद्रपूरमध्ये दोन जण वाहून गेले. या सर्व परिस्थितीचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनामार्फत आढावा घेतला आणि आवश्यक त्या सूचना केल्या.

मुंबईत सकाळपासून मुसळधार पाऊस पडत होता. त्यामुळे सखल भागात पाणी साचले. ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबईतही पावसाचा जोर दिसून आला.

रायगडसह कोकणात तर धुवांधार पाऊस पडत आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतही सततच्या पावसामुळे विविध भाग जलमय झाले होते.

# सर्व्हर डाऊनचा जेएनपीएलाही फटका

## कंटेनर बंदरात अडकले; आयात-निर्यातीवर परिणाम



**उरण : प्रतिनिधी**

मायक्रोसॉफ्ट कंपनीचा सर्व्हर डाऊन झाल्याने जेएनपीए बंदरात हजारो कंटेनर अडकले आहेत. बंदरातील रस्ते वाहनांनी व्यापले असून आयात निर्यातीवर परिणाम झाला आहे.

मायक्रोसॉफ्टचा सर्व्हर डाऊन असल्याचा परिणाम शनिवारी (दि. २०) दुसऱ्या दिवशीही दिसून आला. गुरुवारी संध्याकाळी जेएनपीए बंदरात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कनार्टक, दिल्ली, हरियाणासह इतर राज्यातून कांदा, भाजीपाल्यासह इतर माल भरून शनिवारी सकाळपर्यंत सुमारे ८५०० ते ९००० कंटेनर बंदराच्या गेटपर्यंत पोहचले, मात्र शुक्रवारी सकाळपासूनच मायक्रोसॉफ्ट सर्व्हर डाऊन झाल्याने परदेशात निर्यातीसाठी पाठवलेले कंटेनर जेएनपीए बंदराबाहेर अडकले.

परदेशात जाणाऱ्या जहाजात कुठला कंटेनर कुठल्या जहाजातून रवाना करायचा ही प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाल्याने त्याचा फटका निर्यातसाठी आलेल्या कंटेनरना बसला. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत ही यंत्रणा बंदच होती. यंत्रणा शनिवारी सकाळपर्यंत तरी सुरू होईल अशी वाट पाहणाऱ्या निर्यातदारांना आणखी झळ सोसावी लागली. अखेर शनिवारी सकाळी ११पर्यंत कंटेनर आत घेण्याची प्रकिया मॅन्युअली सुरू करण्यात आली, तर कस्टमकडूनही त्यांची प्रक्रियाही अशीच सुरू करण्यात आली आहे.

धीम्या गतीने होणाऱ्या वाहतुकीमुळे परदेशात निर्यात होणारा नाशवंत कृषी माल वाया जाण्याची भीती निर्यातदारांकडून व्यक्त केली जात आहे, तर वाहने अनेक तास उभी राहिल्याने याचा फटका वाहतूकदारांच्या व्यवसायावरही झाला आहे. त्याचप्रमाणे जेएनपीए बंदरात ये-जा करणाऱ्या मालवाहू जहाजांनाही विलंब होऊ लागल्याने यात भर पडली. त्यामुळे कंटेनरच्या रांगा लागल्याचे दिसून आले. **(पान २ वर..)**

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश

# पनवेलच्या ग्रामीण भागातील रस्त्यांचा होणार विकास

## ५० कोटी रुपयांच्या कामाला मिळाली प्रशासकीय मान्यता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार पनवेल तालुक्यातील १४ रस्त्यांच्या विकासकामांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जवळपास ५० कोटी रुपये खर्च करून या रस्त्यांची दर्जोन्नती होणार आहे.

यानुसार प्रजिमा १३ ते चिंचवली तर्फे तळोजा, शिरवली, वांगणी तर्फे तळोजा रस्ता, राज्य मार्ग १०३ ते वाजे, चेरवली वाजापूर पिंपळवाडी रस्ता, राज्य मार्ग १३ ते शांतीवन, भानघर, चिंचवली तर्फे वाजे रस्ता, वावंजे ते मानपाडा रस्ता, इजिमा २१ ते नितळस रस्ता, वाजे ते बकुळवाडी रस्ता, राज्य मार्ग ८५ ते कानपोली रस्ता, राज्य मार्ग १०३ ते खुटल्याचा पाडा (नेरेपाडा) रस्ता, राज्य मार्ग ८५ ते हेदुटणे रस्ता, राज्य मार्ग १०३ ते सांगटोली रस्ता, राज्य मार्ग १०३ ते धोदाणी रस्ता, राज्य मार्ग १०३ ते बोनशेत रस्ता, धोदाणी ते चिंचवाडी रस्ता, राज्य मार्ग १०३ ते भोकरपाडा रस्ता या सर्व रस्त्यांचा विकास होणार आहे. या रस्त्यांच्या कामासाठी निधी देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली होती. त्यांची मागणी आणि पाठपुराव्याने ५० कोटी रुपयांच्या या कामांना ग्रामविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून तसा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. लवकरच या कामांची निविदा प्रसिद्ध होऊन या रस्त्यांच्या विकासकामाला सुरुवात होणार आहे.

पनवेल तालुक्यातील रस्त्यांच्या कामासाठी मंजुरी दिल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन आणि राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

## नीट पेपर लीकप्रकरणी मास्टरमाईंडसह दोन विद्यार्थ्यांना अटक

**नवी दिल्ली :** नीट-यूजी पेपर लीकप्रकरणी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय)ने आणखी तीन जणांना अटक केली आहे. यामध्ये पेपर लीक टोळीचा मुख्य सूत्रधार शशिकांत पासवानचाही समावेश आहे. याशिवाय या टोळीशी संबंधित दोन विद्यार्थ्यांनाही अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेले विद्यार्थी भरतपूर मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत. कुमार मंगलम आणि दीपेंद्र शर्मा अशी त्यांची नावे आहेत, तर यापूर्वी अटक करण्यात आलेल्या पंकज व राजूचा सहकारी शशिकांत पासवान यालाही अटक केली आहे, जो मास्टरमाईंड आहे.

# खालापूर हशाचीपट्टी येथे मतदान केंद्र सुरू करा

### आमदार महेश बालदी यांची मागणी

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील हशाचीपट्टी आदिवासीवाडी येथे मतदान केंद्र निर्माण करण्यात यावे, अशी मागणी उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांच्याकडे केली आहे.

आंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील हशाचीपट्टी ही आदिवासीवाडी माथेरान डोंगराच्या पायथ्याखाली असून २८० मतदार या ठिकाणी आहेत, मात्र येथील मतदारांना मतदानासाठी ५० किलोमीटर प्रवास करावा लागतो. त्यांना हशाचीपट्टी ते माथेरान-दस्तुरी-नेरळ-बोरगाव (आंबेवाडी) असे अंतर पार करून मतदान करण्याकरिता यावे लागते. यामध्ये त्यांचा वेळ व पैसा जात असल्याने बरचसे मतदार मतदानाकरिता येत नाहीत. त्यामुळे या हशाचीपट्टीमध्येच मतदान केंद्र निर्माण करावे, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांच्याकडे केली आहे.

## निवडक

### वडोदरा येथे शाळेची भिंत कोसळून सहा विद्यार्थी जखमी

**वडोदरा :** गुजरातच्या वडोदरा येथे एका शाळेत मधल्या सुट्टीत मुले जेवत असताना अचानक वर्गाची भिंत कोसळली. त्यामुळे सहा विद्यार्थी बेंचसह पहिल्या माळ्यावरून १० फूट खाली पडले. या घटनेत एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून इतर विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. शुक्रवारी (दि. १९) घडलेल्या या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओदेखील आता समोर आला असून तो व्हायरल होत आहे. या घटनेबद्दल संवेदना व्यक्त होत आहे.

### जम्मू खोऱ्यात दहशतवाद्यांच्या शोधासाठी पॅरा कमांडो तैनात

**श्रीनगर :** गेल्या काही दिवसांमध्ये जम्मू खोऱ्यात झालेले दहशतवादी हल्ले आणि दहशतावाद्यांची घुसखोरी लक्षात घेत भारतीय लष्कराने पूर्ण ताकद पणाला लावली आहे. याआधीच निमलष्करी दल,जम्मू काश्मीर पोलीस दलाव्यतिरिक्त लष्कराचे तीन हजारपेक्षा जास्त जवान युद्धपातळीवर दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. त्यातच आता लष्कराने सुमारे ५०० पॅरा कमांडो जम्मू खोऱ्यात उतरवले आहेत. त्यामुळे पुढील काही दिवस जम्मू खोऱ्यात दहशतवादी कारवायांना वेग येण्याची चिन्हे आहेत.

# मुंबईत इमारतीचा भाग कोसळून महिलेचा मृत्यू; तीन जण जखमी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील ग्रँट रोड रेल्वेस्थानकानजीकच्या स्लेटर मार्गावरील रुबिनिस्सा मंजिल या चार मजली इमारतीच्या छताचा भाग शनिवारी (दि. २०) सकाळी ११च्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला, तर अन्य तीन जण जखमी झाले आहेत.

रुबिनिस्सा मंजिल ही इमारती जीर्ण झाली असून म्हाडाने या धोकादायक इमारतीला यापूर्वी नोटीस बजावली होती. शनिवारी सकाळी इमारतीच्या छताचा काही भाग तसेच तिसऱ्या व दुसऱ्या मजल्यावरील सज्जाचा भाग अचानक कोसळला. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले.

राडारोड्याखाली अडकलेल्या चार जखमींना बाहेर काढण्यात आले. जखमींना तत्काळ नजीकच्या भाटिया रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र जखमींपैकी एका महिलेचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अन्य तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, राडारोड्याच्या ढिगाऱ्याखाली काहीजण अडकल्याची शक्यता असल्याने अग्निशामकांकडून अद्ययावत यंत्राच्या सहाय्याने बचावकार्य हाती घेण्यात आले. याशिवाय सात ते आठ रहिवासी इमारतीच्या चौथ्या मजल्यावर अडकले होते. त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले.

# पालिका कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेणार -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पालिका कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाहीर मेळाव्यात केले.

महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग संघर्ष समिती आणि म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत २० मार्च रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंजूर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी पनवेल महानगरपालिकेसह कोकण विभागीय नगरपालिका, नगरपंचायत कामगार कर्मचाऱ्यांचा जाहीर मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात शनिवारी (दि. २०) झाला. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, तेजस कांडपिळे, बबनराव झिंजूडे, सुनील वाळुंजकर, रमाकांत बने, संतोष पवार, अनिल जाधव, शैलश गायकवाड, अनंता पाटील, दत्तगुरू म्हात्रे, मनोज पुलेकर, अंकुश गायकवाड, बापूसाहेब सदाफुले, राकेश पाटील, अजिंक्य हुलवणे, भूषण काबाडी यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सर्व ताकदीनिशी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.




# रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची कर्जत स्थानकात पाहणी अन् चर्चा



**कर्जत : प्रतिनिधी**

पुण्याला जात असताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी यांनी शनिवारी (दि. २०) सकाळी कर्जत येथे ट्रेन काही काळ थांबली असताना उतरून स्थानकाची पाहणी केली आणि उपस्थितांशी चर्चा केली. या वेळी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी रेल्वेमंत्र्यांना भागातील रेल्वेविषयक समस्यांचे निवेदन दिले.

भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार सुरेश लाड, तालुकाध्यक्ष राजेश भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान सेल जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, माजी नगरसेवक नितीन प्रमार, सरपंच प्रमिला बोराडे, पंकज ओसवाल, राजू ठाणगे, दिनेश भरकले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

या निवेदनात कारशेडसाठी भूसंपादन झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या अडचणी, कर्जत-पनवेल रेल्वेमार्गावर बोगद्याच्या बांधकामावेळी करण्यात आलेल्या स्फोटात हलिवली आणि पुलाचीवाडी येथील ज्या ज्या ग्रामस्थांच्या घरांचे नुकसान झाले त्या सर्वांना नुकसानभरपाई देण्यात यावी, लोकलगाड्या, थांबा या व इतर अनेक समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली आहे. रेल्वेमंत्र्यांनी निवेदनासंदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

# भिसे खिंडीत दरड कोसळली

**नागोठणे : बातमीदार**

सतत पडणाऱ्या पावसामुळे नागोठणे-रोहा मार्गादरम्यान असलेल्या भिसे खिंडीत दरड कोसळण्याची घटना घडली. यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

रायगड जिल्ह्यात शुक्रवारपासून पाऊस पडत असून शनिवारीही पावसाचा जोर कायम होता. अशातच भिसे खिंडीत रोहा पोलीस हद्दीत येणाऱ्या रस्त्यावर रात्रीच्या सुमारास दरड कोसळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, पण दगडगोटे व माती रस्त्यावर आल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. मलबा बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली. असे असले तरी या रस्त्यावरून प्रवास करताना केव्हा काय होईल? याची शाश्वती देता येत नाही.

प्रशासनाने दरडग्रस्त गावांची पाहणी करून त्यांना संरक्षण देण्याची योजना आखली आहे. त्यानुसार संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी दरडग्रस्त भागांची पाहणी करून संभाव्य धोका टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.



**पनवेल : गुरूपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कोमसापचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी कोमसापचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी तसेच अनुप कर्णिक, प्रा.अ‍ॅड. चंद्रकांत मढवी, अ‍ॅड. मनोज म्हात्रे उपस्थित होते.**

# अतिमागास, आर्थिक दुर्बल, ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क अखेर माफ





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील मागास आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार अतिमागास प्रवर्ग (ईबीसी), आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक आणि आर्थिक मागास (एसईबीसी) आणि ओबीसी (ओबीसी) प्रवर्गात पात्र ठरणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींकडून महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी आकारण्यात येणारे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे. संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थांनी हे शुल्क आकारू नये, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून यासंदर्भात शासन परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षात अतिमागास प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, सामाजिक आणि आर्थिक मागास आणि ओबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना या निर्णयाचा मोठा फायदा होणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी शुल्काची मागणीसाठी आग्रह धरल्यास संबधित शिक्षणसंस्थांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे कठोर निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत.

काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारने व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (एसईबीसी) तसेच इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कामध्ये ५० टक्क्यांऐवजी आता १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीला मंजुरी दिली होती. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते.

# खासदार तटकरेंनी घेतला मुंबई-गोवा महामार्गाचा आढावा

**पेण : प्रतिनिधी**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांचा पेण तालुक्यातील खारपाडा ते आमटेम मुंबई-गोवा महामार्ग पाहणी दौऱ्याचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. या वेळी पेणमध्ये प्रांत कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत महामार्गसंबंधी नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नासंदर्भात उत्तर देताना खासदारांसमोर अधिकारी वर्ग निरुत्तर झाले होते.

शुक्रवारपासून मंगळवारपर्यंत खारपाड्याच्या पुलापासून आमटेमपर्यंत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या बरोबर जाऊन अधिकाऱ्यांनी समस्यांचे निराकरण करावे, या कामावर प्रांत अधिकाऱ्यांनी देखरेख ठेवावी, असे आदेश खासदार तटकरेंनी या वेळी दिले. तसेच पुढे त्यांनी काही त्रुटी आल्यास अधिवेशनाच्या दरम्यान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत चर्चा करून सोडविण्यात येतील, असे सांगितले.

या बैठकीसाठी खासदार तटकरे, जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, प्रांत अधिकारी प्रविण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे यशवंत घोटकर आदी उपस्थित होते.





सुरुवातीला खासदार तटकरे यांनी स्थानिकांच्या राष्ट्रीय महामार्गाबाबत समस्या जाणून घेतल्या. यामध्ये तरणखोप, पेण शहर, रामवाडी, वाशी नाका, कांदळे, वडखळ, डोलवी गावांच्या कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या निष्कृष्ट कामामुळे मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्याने गावकरी पूर्ते हैराण झाले असल्याने नागरिकांनी महामार्गाबाबत असलेल्या समस्या मांडल्या.

पेण शहरातून राष्ट्रीय महामार्गवर जात असताना मोठ्या वाहनांना पुढे मागे करावे लागते त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचा प्रश्न पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने यांनी उपस्थित केला. माजी सरपंच योगेश पाटील यांनी जुन्या वडखळ रस्त्याबाबत कैफीयत मांडली. रामवाडी येथील सर्व्हिस रोड संदर्भात माजी नगरसेवक निवृत्ती पाटील यांनी आपली समस्या खासदार तटकरे यांच्या समोर मांडली.

या वेळी मुंबई-गोवा महामार्गाची झालेली दुरवस्था पाहण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी भर पावसात पेण तालुक्यातील खारपाडा ते कासू व पुढे नागोठणे इंदापूर पर्यंत पाहणी केली. या पाहणीदरम्यान शेकडो खड्डे, पेण शहराचा धोकादायक वळणरस्ता, रामवाडी सर्व्हिस रोड, कांदळेपाडा ते वडखळ पर्यंतचा जुना रस्ता, डोलवी गावाजवळचा रस्ता, कोळेटी गावाजवळील सिंगल रोड अशा अनेक प्रलंबित कामाबद्दल खासदार तटकरे यांचेकडे सरपंच ग्रामस्थानी तक्रारी केल्या. याबद्दल रस्ते अभियंता यशवंत घोटकर यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याने रस्त्याची दुर्दशा तर झालीच शिवाय शेकडो लोकांना अपघाताला सामोरे जावे लागले. यामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे रस्ते अभियंता यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी लेखी पत्र खासदार तटकरे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना उपस्थितांच्या वतीने दिले.

सोमवारपासून सुरू होणाऱ्या संसदीय अधिवेशनात रस्ते विषयाबद्दल केंद्रीय बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांचेशी बोलून चर्चा करतील असेही खासदार तटकरे यांनी या वेळी सांगितले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये युवा महोत्सवासाठी ऑडिशन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक समितीच्या वतीने शुक्रवारी (दि. १९) युवा महोत्सवासाठी ऑडिशन घेण्यात आल्या.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे सामाजिक, पर्यावरणीय व सांस्कृतिक उपक्रम घेत असते त्याचाच एक भाग म्हणून सांस्कृतिक समितीने येणाऱ्या युवा महोत्सवासाठी नाटक, गायन व नृत्य लिटररी इव्हेंट तसेच वेगवेगळ्या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांच्या ऑडिशन घेण्यात आल्या. या ऑडिशनसाठी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या ऑडिशन साठी सांस्कृतिक समितीतील सर्व सदस्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले व विद्यार्थ्यांची निवड केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व युवा महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

या ऑडिशनचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती, यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. नीलम मोरे, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. राहुल कांबळे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# रोहा-दिवा रेल्वेगाडी नव्या वेळेनुसार

## रोहा शहर भाजपतर्फे प्रशासनाचे आभार

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा-दिवा गाडी २० जुलैपासून नव्या वेळेनुसार सुरू झाली असून या वेळी रोहा शहर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रोहा शहर भाजपच्या वतीने रेल्वे प्रशासनाचे आभार मानण्यात आले. रोहेकर प्रवाशांच्या मागणीवरून व भाजप रोहे शहराच्या पाठपुराव्यामुळे १६:४० वा. सुटणारी रोहा दिवा पॅसेंजर गाडी आज दि. २० जुलै २०२४ पासून मध्य रेल्वेच्या नवीन वेळापत्रकानुसार १५:५५ वा. रोहे स्थानकातून सुटली. आजपासून प्रवाशांच्या वेळेची बचत होईल व प्रवासी इच्छित स्थळी वेळेवर पोहचतील यामुळे रोहेकरांमध्ये समाधान व्यक्त होत आहे, असे भाजप शहर अध्यक्ष व रोहा रेल्वे स्थानक सल्लागार समिती सदस्य यज्ञेशजी भांड यांनी सांगितले.

या वेळी माजी उपनगराध्यक्ष वसंतराव शेलार, सल्लागार विनायक बेडेकर, उप शहराध्यक्ष उमेश शेडगे, तालुका चिटणीस दिनकर खरिवले, शशीकांत बोंडकर, दादा कुलकर्णी तसेच भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते रोहे स्थानकात उपस्थित होते.





**मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघ येथे दिवंगत पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी, डॉ. भालचंद्र मुणगेकर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष गूरबिर सिंग, पुरस्कार समिती सदस्य प्रकाश महाडिक उपस्थित होते. या वेळी मुंबई प्रेस क्लबचे नवनिर्वाचीत अध्यक्ष समार खडस यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार विकास महाडिक यांनी केले.**

## तबला वादन स्पर्धेचे आयोजन

**मुंबई :** दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रातर्फे रविवार, दिनांक २४ आणि २५ ऑगस्ट २०२४ या दिवशी सकाळी ९.३० वाजता तबला वादन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धा दोन वयोगटात घेतल्या जातील. या स्पर्धा अव्यावसायिक कलाकारांसाठी आहेत. शनिवार २४ ऑगस्ट या दिवशी छोटा गट (१० ते १५ वर्षे) आणि रविवार २५ ऑगस्ट या दिवशी मोठा गट (१६ ते २५ वर्षे) या स्पर्धा घेतल्या जातील. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २२ ऑगस्ट २०२४ आहे. प्रवेश अर्ज संस्थेच्या कार्यालयात, फेसबुकवर तसेच संस्थेच्या www.dadarmatungaculturalcentre.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ०२२-२४३०४१५० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गुरूजनांचा सन्मान राखून विद्यार्थ्यांनी वर्तनशील व्हावे -गोवर्धन गोडगे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सन्मान राखून वर्तनशील व्हावे व उज्वल यश संपादन करावे, असे प्रतिपादन येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी केले. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सन्मान करण्यासाठी आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्यात अध्यक्ष पदावरून बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला.



इयत्ता दहावी ब ह्या गुरुकुल वर्गाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमामध्ये अध्यक्षीय भाषण करताना मुख्याध्यापक गोडगे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आयुष्यामध्ये अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी आपल्या वर्तनात सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे तसेच शिस्त अंगी बाणल्याशिवाय आयुष्यामध्ये यश संपादन करणे अशक्य असल्याचे ठणकावतानाच शिष्याचा चांगुलपणा, त्याची प्रतिष्ठा व त्याने प्राप्त केलेले कार्या यावरच गुरूंचे मूल्यमापन केले जात असल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

विद्यालयातील इयत्ता दहावी ब या गुरुकुल वर्गाच्या वतीने विद्यालयातील सर्व सेवकांचा अर्थात गुरुजनांचा सन्मान करण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष समारंभात विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांना भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन त्यांच्याप्रती सद्भावना व्यक्त करण्यात आली.

या वेळी संपूर्ण सभा नियोजनाचा भार विद्यार्थ्यांनीच पेलला. सूत्रसंचालन, प्रास्ताविक, आभार, भाषणे आदी सर्व सोपस्कर विद्यार्थ्यांनीच पार पाडले.याबद्दल माननीय मुख्याध्यापक यांनी त्यांचे कौतुकही केले. विद्यार्थी व विद्यार्थीनींनी गुरूंचा महिमा व्यक्त करणारी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतून भाषणे केली.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांचेही समायोजित भाषण झाले. या वेळी विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकांपासून तर शिपायापर्यंत सर्व सेवकांना भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन त्यांच्या प्रती आपल्या सद्भावना व कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन अभिलाषा म्हात्रे (१० ब) हिने इंग्रजीतून केले तर याच वर्गातील कपिल सोनकांबळे ह्या विद्यार्थ्याने इंग्रजी भाषेतूनच आभार मानले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचेसह उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर तसेच ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षाली पाटील, ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, राजू खेडकर, उमेश पाटील, जयवंती ठाकूर, अर्चना पाटील, प्रशांत परदेशी, शितलकुमार म्हात्रे, प्रमोद करावकर, द्रौपदी वर्तक, सारिका ठाकूर, प्रणाली पाटील, विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे, लेखनिक चंद्रकांत मढवी यांच्यासह माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजचे सर्व सेवक, विद्यार्थी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोग्राम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२०) व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग, वाणिज्य व अकाउंट व फायनान्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.



या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील तिन्ही शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाविद्यालयात घेतले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच शिस्तीबद्दल, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०, विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, प्लेसमेंट ड्राईव्ह, वेगवेगळ्या नामांकित संस्थांबरोबर असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे माहितीचे आदान-प्रदान याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन प्रा. डॉ. रित थुले, व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग प्रमुख, प्रा. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख, प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तसेच तिन्हीही विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

पान १ वरून

## सर्व्हर डाऊनचा जेएनपीएलाही फटका

बंदरात आलेल्या आयात निर्यात होणाऱ्या मालाचे वेळापत्रक विस्कळीत झाले असून याचा परिणाम व्यापाऱ्यांना बसला असल्याचे मत आयात-निर्यातदार व्यापारी राहुल पवार यांनी दिली.

कंटेनर हाताळणी विलंबाने होत असल्याने वाहतूकदारांच्या समस्या वाढल्या आहेत. यावर उपाययोजना म्हणून रेफरल पॉईंट वाढविणे, बंदरात जागा उपलब्ध होतील त्याप्रमाणे कंटेनर ट्रेलर बंदरात सोडण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष सुनिल पोतदार यांनी दिली.

जहाजे उशिराने येत असल्याने बंदरात जागा रिक्त होण्यास विलंब होत आहे, मात्र हळूहळू कामकाज सुरू झाले असल्याचे जेएनपीएचे मुख्य व्यवस्थापक एस.के. कुलकर्णी यांनी सांगितले.

# द्रोणागिरी हायस्कूलमध्ये गुरूपौर्णिमा उत्सव

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा या विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस. सी. म्हात्रे, सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक पी. आर. पाटील यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन इयत्ता आठवीचे वर्गशिक्षक पी. ए. म्हात्रे व सर्व विद्यार्थी यांनी केले होते. सूत्रसंचालन एन. बी. म्हात्रे यांनी केले होते.

आभार ज्येष्ठ शिक्षक पी. आर. पाटील यांनी मानले व अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## प्रकाश कोठारी

दुखवटा



**रोहे :** शहरातील बांधकाम व्यावसायिक, भात गिरण आदी व्यवसायात यशस्वी भरारी घेणारे माजी नगरसेवक रोहयातील प्रतिष्ठीत व्यापारी प्रकाश मिश्रीमल कोठारी (वय ६८) यांचे बुधवारी (दि. १७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले आणि सुना असा परिवार आहे.

प्रकाश कोठारी यांचे ८९ मध्ये आलेल्या महापुराच्यावेळी चांगले काम केले होते. ते धनगर आळीत भाया नावाने प्रचलित होते. बांधकाम क्षेत्रात ही त्यांनी काम केले असून या आधी राइस मिलचा व्यवसाय केला आहे. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असताना सर्वांशी त्यांनी मैत्रीचे नाते जपले होते.

# निवडक

## गुरूपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांचा मेळावा

**खारघर :** सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने दहावी, १२वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुरुपौर्णिमा मेळावा प्रा. डॉ जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली शांताबाई रामराव सभागृह, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई येथे रविवारी (दि. २१) दुपारी ३ वाजता मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मार्गदर्शन मिळणार आहे.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट पाच इंच, अंगाने सडपातळ, केस काळे व मोठे, तसेच दाढी मिशी वाढलेली असून अंगात भगव्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## फुंडे हायस्कूलमध्ये गुरूपौर्णिमा



**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे उरण येथे शनिवारी (दि. २०) गुरुपौर्णिमा कार्यक्रम साजरा करण्यात आला. जयश्री देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची तयारी केली होती. या वेळी विद्यार्थ्यांनी सर्व गुरुजनांचा गुलापुष्प व लेखणी देऊन सन्मान केला. मनस्वी मिसाळ हिने भाषणात गुरुजनाविषयी आभार व्यक्त केले तर विद्यालयाचे प्राचार्य एम.जी म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक एस.डी. म्हात्रे, साधना पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देत गुरुची महती विशद केली. सूत्रसंचालन शांती चदाना हिने केले.

## महिलेचा मृतदेह आढळला

**पनवेल :** परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तीच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत महिलेचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व पांढरे लांब, उंची अंदाजे पाच फुट, दोन पायाच्या अंगठ्यामध्ये तांब्याचे जोडवे परिधान केलेले आहे तसेच उजव्या हातामध्ये तांब्याचे कडे आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप



**रसायनी :** आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप व वावेघर भाजपतर्फे मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजप गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पं.स. अध्यक्ष सुनील माळी, माजी सरपंच विजय चव्हाण, प्रभारी सरपंच प्रकाश गाताडे, महादेव कांबळे, माजी उपसरपंच विलास माळी, अशोक गायकर, सदस्य रामचंद्र माने, रवी राठोड, रूतिका माळी, चारूबाई राठोड, उर्मिला खारकर, संतोष खारकर, प्रभाकर राठोड, कृष्णा खारकर, तुकाराम माळी, लक्ष्मी माळी, ताई माळी, पुंडलिक माळी, कृष्णा शिंदे, माजी सरपंच गणपत केदारी आदी उपस्थित होते.



**पनवेल :** वेश्वी ग्रुप ग्रामपंचायत येथील प्राथमिक विद्यामंदिर येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे शनिवारी वह्यावाटप कार्यक्रम झाला. या वेळी उपसरपंच प्रमिला महेंद्र मुंबईकर, शिवदास नारायण पालकर, सुहास राजाराम मुंबईकर, महेंद्र मुंबईकर, केशव मुंबईकर, राजेंद्र पाटील यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी प्रास्ताविकामध्ये भाजप शहर चिटणीस ॲड. विनायक मुंबईकर यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सामाजिक कार्याबद्दल कौतुक केले.

## सुकापूरमध्ये डेंग्यू आजारावर नियंत्रण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जुलै महिन्याच्या अगदी सुरुवातीला सुकापूर हद्दीमध्ये ताप रुग्णांमध्ये वाढ होऊन त्यांना डेंग्यू सदृश्य लक्षणे दिसून येत होती. त्यानुसार परिस्थिती लक्षात घेत पालीदेवद ग्रुप ग्रामपंचायत व प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे येथील आरोग्य पथकाच्या माध्यमातून ताला प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुकापूरमध्ये डेंग्यू आजारावर नियंत्रण मिळविण्यात आले आहे, असा दावा पालीदेवद ग्रुप ग्रामपंचायतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये अनुक्रमे कन्स्ट्रक्शन साईटवरील सर्वेक्षण करून औषधफवारणी करणे, बांधकाम साईटच्या सभोवतालच्या सोसायटीमध्ये कंटेनर सर्वेक्षण करणे, संपूर्ण कार्यक्षेत्रात धूर फवारणी व औषध फवारणी करून डासांचा प्रादुर्भाव व प्रसार यावर नियंत्रण मिळविले आहे. पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके तसेच लाऊडस्पीकर यांच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती केलेली आहे तसेच अजूनही करण्यात येत आहे.

बांधकाम व्यावसायिक, गॅरेज व टायर्स इ. काम करणाऱ्या लोकांसोबत चर्चा करून डासांचा प्रादुर्भाव कमी करणे कामी आरोग्य शिक्षण देण्यात आले आहे. जिल्हा हिवताप अधिकारी यांनी भेट देवून संपूर्ण कार्यक्षेत्राचा आढावा घेतला असून ताप रुग्णांची संख्या कमी झाली आहे. ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवर व प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे यांचे मार्फत सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू ठेवण्यात आल्या आहेत, अशी माहिती पालीदेवद ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आली आहे.

## ग्रामसुधारणा अध्यक्षपदी देवेंद्र तांडेल यांची निवड

**उरण : बातमीदार**



उरण तालुक्यातील प्रसिद्ध अशा करळ गावच्या ग्रामसुधारणा कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी करळ गावचे सुपुत्र तसेच सामाजिक कार्यकर्ते, करळ गावचे माजी अध्यक्ष वसंत हसूराम तांडेल यांचे सुपुत्र देवेंद्र वसंत तांडेल यांची भाजपतर्फे बिनविरोध निवड करण्यात आली आहे.


देवेंद्र वसंत तांडेल यांची अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या वेळी भारतीय जनता पक्षाचे करळ गाव अध्यक्ष सुरज गणेश तांडेल, उपाध्यक्ष चेतन बबन तांडेल माजी अध्यक्ष गणेश टिळक तांडेल, भारतीय जनता पक्षाचे प्रमुख सल्लागार सतीश अनंत तांडेल, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते भगवान बाळाराम तांडेल, ह.भ.प अनंत हसुराम तांडेल, लहू हसुराम तांडेल माजी सरपंच अरविंद विष्णू तांडेल, माजी अध्यक्ष निलेश अ. तांडेल, महेश अनंत तांडेल, श्रीकांत तांडेल, धीरज सु. तांडेल, सुजित तांडेल, वासुदेव तांडेल, यतिश तांडेल, सचिन तांडेल, दीपेश तांडेल, अनिकेत तांडेल, दिवेश तांडेल व ब्रदर ग्रुप करळचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

ग्राम सुधारणा कार्यकारी मंडळात अध्यक्ष देवेंद्र तांडेल, उपाध्यक्ष मितेश तांडेल, सेक्रेटरी महेश तांडेल, खजिनदार मधुकर तांडेल, पंच हिराचंद्र तांडेल, निखिल ठाकूर, वैभव तांडेल, तेजस तांडेल, विजय तांडेल, मढवी कमलाकर कडू आहेत.

## कार परत न केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

गुजरात येथे जाण्याकरिता कार घेऊन ती कार परत न केल्याप्रकरणी निकुज प्रफुल्ल शहा (रा. भांडुप वेस्ट मुंबई), प्रफुल्ल शहा आणि आयुष मोटा या तिघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.




किरण लबडे हे खानावळे येथे राहत असून त्यांचा साडी विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार (एमएच ४६ सीएच ८३४५) आहे. त्यांची ओळख एपीएमसी मार्केट येथील निकुज शहा व आयुष मोटा यांच्यासोबत झाली. त्यांच्यात मैत्रीचे संबंध निर्माण झाले. मार्च महिन्यात निकुज याने फोन करून नातेवाईक आजारी असल्याने वडिलांना अर्जंट गावी गुजरात येथे जायचे आहे त्यासाठी कारची मागणी केली. त्यानंतर त्यांचे वडील प्रफुल्ल शहा यांचा फोन आला व दहा दिवसांनी गावावरून परत आल्यावर गाडी परत देतील असे सांगितले. निकुज आणि आयुष मोटा कार घेऊन गेले. त्यांना एप्रिल महिन्यात फोन केला असता चार-पाच दिवसात येतो असे सांगितले, मात्र कार परत आणली नाही.

निकुज यांच्या वडिलांना फोन करून विचारणा केली असता कार तीन लाख रुपयांमध्ये गहाण ठेवली असल्याचे सांगितले. त्यामुळे निकुज शहा, प्रफुल शहा आणि आयुष मोटा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भाजपतर्फे खारघर वपोनि वैशाली गलांडे यांना शुभेच्छा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर पोलीस ठाण्याच्या नवनियुक्त वरिष्ठ निरीक्षक वैशाली गलांडे यांना भाजप खारघर मंडळ, महिला मोर्चा व युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या व खारघरच्या समस्यांबाबत चर्चा केली.





या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, मंडळ उपाध्यक्ष संजय घरत, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, उपाध्यक्ष अंकिता आरंग, युवा मोर्चा अध्यक्ष नितीश अभिमन्यू पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय लोखंडे आदी उपस्थित होते. लोखंडे, भरत कोंढाळकर, शैलेंद्र त्रिपाठी, सुमित सहाय, अशोक जांगीड, तुकाराम कंठाळे, हार्दिक पटेल, वैभव शेजवळ, चिटणीस आदित्य हातगे, प्रथम पाटील, सिमा खडसे, मेडिकल सेल संयोजिका ज्योती जाधव उपस्थित होते.

## खनिज उत्खनन केल्याप्रकरणी दंड

**पनवेल :** गौण खनिज बेकायदा उत्खनन प्रकरणी तालुक्यातील सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी शेडुंग यांना अप्पर तहसीलदार, पनवेल यांनी तीन लाख पाच हजार ५८० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

शेडुंग येथील जमीन मिळकतीमध्ये ९६६ ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याची तक्रार पनवेल तहसील कार्यालयात करण्यात आली होती. त्यानुसार ९०० ब्रास गौण खनिजाच्या पावत्या सादर करण्यात आल्या, मात्र ६६ ब्रास अनधिकृत उत्खनन केल्याचे दिसून आले. त्यामुळे शासनाचा महसूल बुडवून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात आले. या प्रकरणी दंड ठोठाविण्यात आला.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गुरूपौर्णिमा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात दहावीच्या वर्गातर्फे गुरुपौर्णिमा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व पालक माता शालिनी मढवी व आशा दापोलकर या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्याज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते व्यास मुनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्याचबरोबर विद्यालयाच्या उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार, वेदांगी मोकाशी, आशा कस्पटे, भारती कोळी व अशोक ठाकूर यांनी व्यास मुनींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे यांनी गुरु व शिष्याचे नाते आणि त्यातून होणारी शिष्याची योग्य दिशेने वाटचाल विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. पल्लवी पवार यांनी स्वतःच्या यशाचे गमक आपल्या गुरूंना मानले. विशाखा गावंड यांनीदेखील विद्यार्थ्यांना गुरुमुळे आयुष्याला योग्य दिशा मिळते हे स्पष्ट केले.

मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीत येणाऱ्या गुरूंना ओळखण्याची क्षमता प्राप्त करा, असे आवाहन करून डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

शेवटी दहावीच्या विद्यार्थ्यांनी भेटवस्तू देऊन सर्व गुरुजनांचा सन्मान केला. या वेळी पालक माता म्हणून उपस्थित असणाऱ्या शालिनी मढवी यांनी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांना भेटवस्तू देऊन त्यांना सन्मानित केले.

## इनरव्हिल क्लब ऑफ पनवेलचा पदग्रहण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी या सामाजिक संस्थेचा पदग्रहण सोहळा नुकताच डिस्ट्रीक्ट ३१३च्या चेअरमन डॉ. शोभना पालेकर यांच्या प्रमुख उपास्थितीत झाला. नवीन कार्यकारिणी अध्यक्ष प्रतिभा डांगी यांना अध्यक्षांच्या हस्ते कॉलर व पीन प्रदान करून क्लबचा कार्यभार सोपविण्यात आला.



आषाढी एकादशीचे औचित्य साधून टाळ व विठ्ठलनामाच्या गजरात आरती ओवाळून प्रमुख अतिथी डॉ. शोभना पालेकर व डॉ. प्राजक्ता परितेकर यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे व क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करून रिया मिरानी यांच्या गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

मावळत्या अध्यक्ष ध्वनी तन्ना यांनी त्यांचा वार्षिक कार्यकाल उत्तमरित्या पार पाडण्यात ज्यांचे ज्याचे सहकार्य लाभले अशा सर्वांचे आभार व्यक्त केले व नवनिर्वाचित अध्यक्ष प्रतिभा डांगी व टीमला शुभेच्छा देऊन आपल्या कार्यकालात सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेल्या विविध कार्यांची माहिती दिली.

कार्यकारिणीत व्हॉईस प्रेसिडेंट बिजल मिरानी, सेक्रेटरी वैशाली कटारिया, खजिनदार हेतल बालड, आयएसओ सिंपल आंचलिया, एडिटर ममता ठक्कर, क्लब करस्पॉडंट गौरी देसाई, जॉईन्ट सेक्रेटरी स्नेहल कल्याणकर व कार्यकारिणी सदस्य विजयता कोठारी, मौसुमी गोगुला, नम्रता बांठिया या सर्वांना पीन देऊन पदग्रहण करण्यात आले. नवीन मेंबर्सना क्लबच्या चार्टर प्रेसिडेंट हेतल बालड यांच्या हस्ते शपथ देऊन त्यांचे क्लबमध्ये स्वागत करण्यात आले.

एडिटर ममता यांचे २०२४-२५च्या कार्यकाळातील त्यांचे प्रथम बुलेटिन व गौरी देसाई यांच्या फेलोशिप डायरीचे अध्यक्षांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल या संस्थेला मोतिबिंदू शस्त्रक्रियासाठी पाच हजार रुपयांचा चेक व एन.एम. जे फाउंडेशनला प्राथमिक उपचारांसाठीचे साहित्य देण्यात आले.

## सीकेटी महाविद्यालयाच्या एनएसएस विभागातर्फे रिटघर येथे वृक्षारोपण


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आणि लायन्स क्लब नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १९) ग्रामपंचायत रिटघर येथे वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत रिटघर सदस्य, पदाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती लाभली.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याद्वारे सुरू केलेल्या आईच्या नावे एक झाड या उपक्रमांतर्गत मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या निर्देशानुसार सीकेटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे एक स्वयंसेवक एक झाड या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमदिनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तथा कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या चमुने सकाळी ९.३० वाजता उपक्रमस्थळाकरीता महाविद्यालयातुन प्रस्थान केले. या चमूचे ग्रामपंचायत रिटघर सदस्य आणि कर्मचाऱ्यांमार्फत स्वागत करण्यात आले.

ग्रामपंचायत रिटघरचे सरपंच सुभाष भोपी आणि रिटघर उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे सर यांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच उपस्थित विद्यार्थी, स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी वेगवेगळ्या प्रकाराच्या एकूण ६५० रोपांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या वेळी ग्रामपंचायत रिटघरचे सर्व सदस्य व कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. वृक्षारोपण मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी.डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पूजा दांदळे, एन.एस.एस. अभ्यासक्रम समन्वयक प्रा. रूपेश माने यांनी विशेष परिश्रम घेतले.




# मनोजकुमार

## देशभक्तीचा हुकमी फॉर्म्युला

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



साठ आणि सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटसृष्टीवर विशेष प्रभाव टाकलेला कलाकार म्हणजे मनोजकुमार. २४ जुलै रोजीच्या सत्याऐंशीव्या वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा!

तुम्हालाच मी सुरुवातीस प्रश्न करतो, तुम्हाला मनोजकुमार अभिनेता म्हणून आवडतो की दिग्दर्शक म्हणून? पडद्यावरचा सोबर कलाकार की जनसामान्यांमध्ये देशभक्ती जागी करणारा सिनेमावाला? हाच मनोजकुमार काहींच्या दृष्टीने मात्र थट्टेचा विषय असतो, तर काहींना त्याला दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित आल्याचे आवडले नाही. होतं असे कधी कधी. एकाच यशस्वी माणसाबद्दल अनेकांची भिन्न मते असू शकतात.

मला दिग्दर्शक म्हणून मनोजकुमार जास्त आवडतो. चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे आणि त्यात त्याने मास्टरी दाखवली. एकदा आशा पारेखच्या मुलाखतीचा योग आला असता मनोजकुमारबद्दल मी प्रश्न करताच आशा पारेखने मला सांगितले, त्याच्यासोबत काम करताना माझ्या एक गोष्ट लक्षात आली, एक तर आपले दृश्य कॅमेऱ्यातून कसे दिसतेय हे जाणून घेण्यासाठी मनोजकुमार कॅमेरामनच्या मागे उभे राहून जाणून घेई तसेच तो आपलं दृश्य नसले तरी असेच करे. सुरुवातीस मला समजेना तो असे का करतोय. मग लक्षात आले तो दिग्दर्शक व्हायची तयारी करतोय आणि त्याने दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट 'उपकार'ची मी नायिका होते, आशा पारेखने म्हटलं. आणि त्या मताशी मी सहमत आहे.

मी मनोजकुमारवर फोकस टाकतो तेव्हा, साठ सत्तरच्या दशकातच 'देशभक्तीपर चित्रपटाचा हुकमी जनक' अशी स्वतःची ओळख निर्माण केली (आजच्या कार्पोरेट युगात त्याला फॅशन म्हणून 'ब्रॅण्ड नेम' म्हणतात...). त्यातून त्याचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला (चित्रपटाच्या जगात ही मिळकत खूपच मोठी असते. प्रेक्षकांना आपलसं करणे, त्यांना आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटाबद्दल विश्वास वाटणे हे अजिबात सोपे नाही... ती एक वेगळीच खेळी) आणि मनोजकुमार निर्मित व दिग्दर्शित चित्रपट पडद्यावर आला रे आला की देशभक्तीभावाने पाहणे हे जणू हुकमी समीकरण. ग्रेट. मानलं त्याला.

केवल कश्यप निर्मित व एस. राम शर्मा दिग्दर्शित 'शहीद' (१९६५) चित्रपटात मनोजकुमारने शहीद भगतसिंग साकारला आणि जणू 'देशभक्त नायक ' अशा त्याच्या प्रतिमेची जणू पायाभरणी झाली. या चित्रपटाच्या यशाने त्याला हे दिले... यशस्वी चित्रपट प्रत्येकाला काहींना काही देत असतोच. आपला हा चित्रपट तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी पहावा म्हणून मनोजकुमारने केलेली विनंती त्यांनी मान्य केली आणि फक्त अर्धा तास आपण हा चित्रपट पाहू असे म्हटले, पण चित्रपटाने माननीय पंतप्रधानाना विलक्षण प्रभावित केले. त्यांनी 'शहीद' चित्रपट पूर्ण पाहिला आणि मनोजकुमारला विनंती केली, आपल्या देशाचे बोधवाक्य 'जय जवान जय किसान' याला प्राधान्य मिळेल असा चित्रपट त्याने निर्माण करावा. नवी दिल्ली ते मुंबई अशा राजधानी एक्स्प्रेस प्रवासात त्याने यावर मनोमन विचार केला. ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. मनोजकुमारने यापासून प्रेरणा घेऊन एक चित्रपट लिहायला घेतला, आपण निर्माता व दिग्दर्शक म्हणून पाऊल टाकायचे ठरवले, विशाल एन्टरप्रायझेस ही आपली चित्रपट निर्मिती संस्था स्थापन केली आणि साठच्या दशकातील भारतीय समाजमनाचे प्रतिबिंब पडेल असा चित्रपट पडद्यावर आणला, 'उपकार' (१९६७). आजही या चित्रपटाच्या नावाभोवतीचे वलय कायम आहे, हे खरे यश.

यात मनोजकुमारने 'भारत' नावाची व्यक्तीरेखा साकारली. तीच त्याची मग 'देशभक्त नायक भारतकुमार' अशी ओळख झाली. ती त्याला कायमच चिकटली. त्याच्या निस्सीम चाहत्यांना हीच इमेज प्रचंड प्रिय. मनोजकुमारने पहिल्याच दिग्दर्शनात काही लक्षवेधक गोष्टी केल्या. क्रूरकर्मा व्हीलन म्हणून ज्याला पडद्यावर आला की ज्याचं छद्मी कावेबाज हास्य, कपटी नजर आणि दुष्ट हेतूने भुवया उंचावणारच अशा'... आणि प्राण याला 'उपकार'मध्ये चक्क पडद्यावरचा सभ्य माणूस बनवले. (प्रत्यक्षात तो प्रचंड समजदार होता, हे एका मुलाखतीच्या निमित्ताने मी अनुवभलंय) आणि चित्रपटातील मेरे देश की धरती सोना उगले... हे देशभक्तीवरील सळसळते गाणे असं आणि इतकं काही लोकप्रिय झाले की तेव्हापासून आजपर्यंत आणि आता पुढेदेखील प्रत्येक राजकीय सणाला लाऊडस्पीकरपासून अनेक माध्यमातून आवर्जून त्याला स्थान मिळतेच मिळते. लोकप्रिय गाणी एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यांत नेत असतातच ते हे असे. रेडिओ विविध भारतीपासून इराणी हॉटेलमधील ज्युक बॉक्सपर्यंत सगळीकडे मेरे देश की धरती...

'उपकार' मुंबईत मेन थिएटर लिबर्टीत प्रदर्शित होताच फर्स्ट शोपासूनच सुपर हिट. काही आठवड्यांनी ऑपेरा हाऊस चित्रपटगृहात आला आणि ज्युबिली आठवडे मुक्काम केला. रौप्य महोत्सवी यश म्हणजे पिक्चर हिटवर कायमचे शिक्कामोर्तब.

'उपकार'ने सर्वात महत्त्वाचे काय केले? मनोजकुमारमधील निर्माता व दिग्दर्शकाचा आत्मविश्वास वाढवला. त्यासह आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटातील प्रत्येक गाण्याचे अप्रतिम आणि विलक्षण प्रभावी असे दृश्य सौंदर्य दाखवण्यातील त्याची कल्पकता क्या कहने? एक स्वतंत्र गोष्ट. पडद्यावर गाणे कसे असावे याचे उत्तम उदाहरण. पटकथेच्या ओघात ती गाणी येत असल्यानेच पडद्यावर गाणे सुरू होताच कोणी खुर्ची सोडून लघुशंका अथवा चहाला बाहेर पडत नसे, हेसुद्धा महत्त्वाचं. भारतीय चित्रपट संस्कृतीत गीत संगीत व नृत्य हा गाभा. आणि त्यात ठसा उमटवून वेगळेपण अधोरेखित करणे हे मनोजकुमारचे विशेष यश.

दिग्दर्शक असा अनेक गोष्टींसह घडतो असेच म्हणायला हवे. 'उपकार'च्या यशानंतर मनोजकुमारने आपल्या पुढच्या चित्रपटाची कथा कल्पना ठरवली, विदेशात विशेषत: इंग्लंडमध्ये राहत असलेल्या भारतीयांना आपल्या भारत देशाच्या संस्कृती, परंपरा, सभ्यता, मूल्ये यांचे महत्त्व एका प्रेमकथेतून पटवून देणे. भारतीय नायक (मनोजकुमार) लंडनला जातो आणि तेथे स्थायिक झालेल्या भारतीय नायिकेसोबतची (सायरा बानू) त्याची प्रेमकथा असे मध्यवर्ती कथासूत्र. चित्रपटाचे नाव 'हरे राम हरे कृष्ण'. (नाव वाचून दचकलात का?)

मनोजकुमार सायरा बानूला साईन करण्यासाठी पाली हिलवरील तिच्या बंगल्यावर गेला असता दिलीपकुमारने नेहमीप्रमाणेच अतिशय दिलखुलासपणे त्याचे स्वागत केले. त्याला वाटले मनोजकुमार आपल्याला साईन करायला आला आहे. (या दोघांनी तत्पूर्वी आदमी या चित्रपटात एकत्र भूमिका साकारलीय, मनोजकुमार दिलीपकुमारचा जबरदस्त फॅन. त्याच्या अभिनय शैलीवर दिलीपकुमारचा विलक्षण प्रभाव. त्याला तात्कालिक समीक्षक 'नक्कल' म्हणत). आपल्याला नव्हे तर सायरा बानूला साईन करण्यासाठी मनोजकुमार आलाय हे समजताच दिलीपकुमार आतल्या रूममध्ये गेला...

चित्रपटातील अन्य कलाकारांची निवड, तंत्रज्ञांची आखणी, गाण्यांचे रेकॉर्डिंग, देश-विदेशातील शूटिंगच्या तारखा हे सगळेच घडत असतानाच चित्रपटाचे नाव 'पूरब और पश्चिम' असे करण्यात आले. (देव आनंदने मनोजकुमारकडून 'हरे राम हरे कृष्ण' हे नाव घेऊन त्या नावाचा चित्रपट बनवला आणि तोही सुपरहिट. हाही एक फिल्मी अड्ड्यावरचा मस्त किस्सा)

आता थीमनुसार लंडनला शूटिंग, पण मनोजकुमारला विमान प्रवासाची ॲलर्जी (की भीती?) म्हणून त्याने आपले काही सहकलाकार आणि तंत्रज्ञ यांच्यासह चक्क मुंबई ते लंडन बोटीने येण्या-जाण्याचा प्रवास केला. महिना लागला म्हणे. या अनुभवावर त्याने एक चित्रपट निर्माण करायला हवा होता.

चित्रपटात अशोककुमार, विनोद खन्ना, भारती, निरूपा रॉय, प्रेम चोप्रा, मदन पुरी, मनमोहन, ओम प्रकाश इत्यादींच्या प्रमुख भूमिका. विनोद खन्नाची भूमिका छोटी होती, पण मनोजकुमारने त्याला सल्ला दिला, तू माझा चित्रपट साईन केल्याची मीडियात काही ठिकाणी बातमी प्रसिद्ध करून आण. चित्रपटसृष्टीचे तुझ्याकडे लक्ष जाईल. विनोद खन्नाने ते करताच त्याला एकदम आठ चित्रपट मिळाले. चित्रपटसृष्टीच्या कार्यशैलीचे हे एक उत्तम उदाहरण. अशाच अनेक छोट्या छोट्या गोष्टींसह चित्रपटाचे जग गुंफलंय, रंगलंय, उत्सुकता वाढवतेय.

चित्रपटाची गाणी इंदिवर, प्रेम धवन आणि संतोष आनंद यांची. त्यातही संतोष आनंद यांना चित्रपटाच्या श्रेयनामावलीत चक्क नवीन गीतकार असे श्रेय. (गीतकार, संगीतकाराबद्दल असं क्वचितच घडणारे) मनोजकुमारने नवी दिल्लीत एका कविसंमेलनात संतोष आनंद यांच्या कविता ऐकल्यावर तो विलक्षण प्रभावित झाला आणि त्यांना चित्रपट गीतकार म्हणून पहिली संधी दिली. संतोष आनंद यांनी 'पूरवा सुहानी आयी रे' हे गाणे लिहिले आणि चित्रपटसृष्टीतील आपली वाटचाल सुरू केली. चित्रपटातील दुल्हन चली, कोई जब तुम्हारा, ओम जगदीश हरे, ट्विंकल ट्विंकल लिटील स्टार, भारत का रहनेवाला हू ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटात खरंतर पाहण्यासारखे हेच होते. संगीत कल्याणजी आनंदजी यांचे. त्या काळात रेडिओवर गाणी ऐकवण्यासाठी संगीतकारांना पुढाकार घ्यावा लागे. तसा त्यांनी तो न घेतल्याने मनोजकुमारने त्यानंतर त्यांच्यासोबत काम करणेच थांबवले.

चित्रपटाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळापासून होते तो भाग कृष्ण धवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट आहे आणि मग स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चित्रपट रंगीत आहे. चित्रपट रसिकांना हे फार आवडले.


मनोजकुमारच्या दिग्दर्शनातील 'शोर' (१९७२), रोटी कपडा और मकान (१९७४), क्रांती (१९८१) या चित्रपटात यशाची चढती कमान अनुभवली. त्यानंतर मात्र 'घसरण' सुरू झाली. जणू फॉर्म हरवला. एव्हाचा चित्रपट रसिकांची पुढची पिढी आली होती. मनोजकुमार दिग्दर्शित 'क्लर्क' (१९८९) आणि 'जय हिंद' (१९९९) अपयशी ठरले आणि मनोजकुमारने दिग्दर्शक म्हणून थांबणे पसंत केले. योग्य निर्णय. स्वतःच्या प्रतिमेच्या प्रेमात असलेल्या भल्याभल्याना कुठे कधी नि का थांबायचे हेच समजत नाही आणि पुढील पिढीच्या कार्यशैलीशी जुळवून घेता न आल्यास विलक्षण चिडचिड होत जाते... मनोजकुमारला वेळीच समजले आपण पडद्याआड जाऊन आपलं एक आयुष्य जगावे आणि जुहू येथील आपल्या बंगल्याच्या जागी त्याने छान देखणी इमारत उभारलीय.

राजेश खन्नासोबत काम करण्याचे त्याचे दोन योग हुकले. 'उपकार'मध्ये प्रेम चोप्राने साकारलेल्या भूमिकेसाठी राजेश खन्नाला विचारले होते अशी फोटो बातमी आजच्या सोशल मीडियात व्हायरल झाली. खरंतर या गोष्टीची कुठेच फारशी वाच्यता झाली नव्हती. तर 'क्रांती' निर्मितीच्या अगोदर मनोजकुमारने 'नया भारत' या चित्रपटाची घोषणा करताना त्यात राजेश खन्नाची भूमिका असल्याची बातमी त्या काळात इंग्लिश मीडियात प्रसिद्ध झाली होती. हेही घडायचे राहून गेले. आपले हुकमी दिग्दर्शक सोहनलाल कंवर यांनी 'धनवान'मध्ये राजेश खन्नाला घ्यावे हा सल्ला मनोजकुमारचा!

मनोजकुमारच्या अन्य दिग्दर्शकांकडील चित्रपटातील काही महत्त्वाचे, त्यातून अभिनेता मनोजकुमार घडत गेला. विजय भट्ट दिग्दर्शित हरियाली और रास्ता व हिमालय की गोद मे, राजेंद्र भाटीया दिग्दर्शित डॉ. विद्या, किशोर शाहू दिग्दर्शित गृहस्थी व घर बसाके देखो, एस. राम शर्मा दिग्दर्शित शहीद, राज खोसला दिग्दर्शित वह कौन थी, दो बदन व अनिता, शक्ती सामंता दिग्दर्शित सावन की घटा, राजा नवाथे दिग्दर्शित गुमनाम व पत्थर के सनम, राम महेश्वरी दिग्दर्शित नील कमल, मोहन सैगल दिग्दर्शित साजन, राज कपूर दिग्दर्शित मेरा नाम जोकर, सोहनलाल कंवर दिग्दर्शित पहेचान, बेईमान व संन्यासी, एस. अली रझा दिग्दर्शित दस नंबरी, अशोक भूषण दिग्दर्शित शिरडी के साईबाबा या यशस्वी चित्रपटातून मनोजकुमारचे स्थान बळकट होत राहिले. विविध प्रकारच्या भूमिका त्याने यात वठवल्यात. भले कोणी म्हणोत तो दिलीपकुमारची नक्कल करे...

दुसरीकडे पहावे तर त्याच्या दिग्दर्शन प्रवासातील देशभक्तीचा सुपर हिट फॉर्मुला आणि गाण्यांचे अप्रतिम रूपेरी पडद्यावरील सादरीकरण या गोष्टी प्रचंड जमेच्या. मला त्याची तीच गोष्ट आवडते. मनोजकुमारला पुन्हा एकदा वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा!







---

# गुरूपौर्णिमा

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये देव-देवतांना जितके महत्त्व आहे, त्यापेक्षा थोडे अधिक महत्त्व आहे ते गुरूला. मानवी जीवनातल्या जडणघडणीमध्ये गुरूचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. ज्या गुरूंमुळे आपल्या जीवनाला आकार मिळतो, ज्याच्यामुळे आपल्या प्राप्त नरजन्माचे खऱ्या अर्थाने सार्थक होते त्या सद्गुरूंचे महत्त्व ते काय सांगावे!

वर्षभरात ज्या काही पौर्णिमा येतात त्यापैकी आषाढात येणारी पौर्णिमा गुरूंच्या स्मृतीत समर्पित केली जाते. याच पौर्णिमेला गुरूपौर्णिमा म्हणतात. गुरूपौर्णिमा हा गुरूपूजनाचा दिवस. या दिवशी शाळेत, मठ, मंदिरात, अभ्यास मंडळांत, आश्रमांत, गुरूकुलात गुरूंचे पूजन केले जाते. आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस.

नवजात जन्मलेल्या बालकाची प्रथम गुरू असते ती माता. चाला बोलायला लागला की त्या जीवावर संस्कार घडवतो तो पिता. शालेय जीवनात ज्ञान, कला, विज्ञान यांचे जे आपल्याला धडे देतात ते शिक्षक-शिक्षिका. आपण कोण आहोत, आपल्या जन्माच कारण काय, प्राप्त नरजन्माची खरी सार्थकता मिळेल याचे मार्गदर्शन करणारे सद्गुरू. अशा अनेक व्यक्तीमत्वांमधून ते गुरूतत्त्व आपण अनुभवत असतो. खरं पूजन, खरी गुरूपूजा म्हणजे गुरूंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सद्गुरूंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे गुरू पूजन.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुरू-शिष्याच्या नात्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याकडे जसे सद्गुरू आहेत तसेच सद्शिष्यही आहेत. या दोन्ही मोठ्या परंपरा आपल्याकडे आहेत. गुरूशिष्यांच्या परंपरेत आपल्याकडे अनेक नावे आहेत. उदा : व्यास आणि गणेश, वशिष्ठ आणि राम, कृष्ण आणि सांदिपनी, मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथ, निवृत्ती ज्ञानदेव, जनार्दन स्वामी व एकनाथ.

हिंदू धर्मात महर्षी व्यास आद्य गुरू समजले जातात. या दिवशी व्यास मुनींनी ब्रम्हसुत्रांचे लिखाण पूर्ण केले होते असे मानले जाते. याच दिवशी व्यासांचा जन्म झाल्याचेही मानले जाते. त्यामुळेच काही जण या गुरूपौर्णिमेलाच व्यास पौर्णिमा असेही म्हणतात. गुरू या शब्दाचा अर्थ खूपच व्यापक आहे.

*गुरू ब्रम्हा गुरु विष्णू*
*गुरु देव महेश्वर*
*गुरू: साक्षात् परब्रह्म,*
*तैस्मय: श्री गुरुवे नमः।।*

या श्लोकात तर गुरूला वंदन करून गुरूला देवतूल्य दर्जा दिला आहे. हिंदु संस्कृतीत तर अनेक थोर संतांनी ग्रंथ लिहून समाजाला वाट दाखवली. या दिवशी शिष्याने गुरूला गुरुदक्षिणा देण्याची प्रथा आहे.

या दिवशी शाळेमध्येदेखील विद्यार्थी आपल्या शिक्षक शिक्षिकांना फुलं देतात, एखादी भेटवस्तू देतात. अशा वस्तू देणे, नारळ हार पेढे शाल गुरूंना देणे या जरी बाह्य खुणा असल्या तरी खरी खूण म्हणजे शिष्यानं गुरूंना केलेत नमन, त्यांच्या पदी घेतलेली अनन्य भावाची शरणांगती! गुरूवंदनांत, गुरु नमनांत शरणांगत भाव हवा, कृतज्ञता हवी.

बुद्ध धर्मीयामध्येही गुरूपौर्णिमा साजरी केली जाते. या दिवशी भगवान बुद्धांनी सारनाथ इथे पहिल्यांदा प्रवचन दिल्याचे मानले जाते. या स्मृतीप्रित्यर्थ गुरूपौर्णिमा साजरी होते. अशा या गुरूपौर्णिमेनिमित्त सर्व महनीय व्यक्तींना वंदन!

**(साभार : विकासपीडिया)**

---

# युवा पिढीच्या प्रगतीसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जाणार आहे. ही योजना राज्यातील बारावीपासून पुढील सर्व प्रकारचे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता पाच हजार ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून या योजनेसाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असणे आवश्यक आहे. विनाअनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारांना आस्थापना, उद्योग, महामंडळामार्फत प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कालावधीत त्यांना कुशल-अर्धकुशल प्रकारचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येईल.

कार्य प्रशिक्षण कालावधी सहा महिन्यांचा राहणार असून या कालावधीत बारावी उत्तीर्ण उमेदवारांना सहा हजार रुपये, आयटीआय व पदविका उत्तीर्णांना आठ हजार रुपये, तर पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन मिळणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप्स, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविणे गरजेचे आहे. उद्योगक्षेत्रात प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे (इंटर्नशिप) उमेदवारांना रोजगारक्षम करून उद्योगाकरिता कुशल मनुष्यबळ तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षणाच्या (इंटर्नशिप) संधी उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय शासकीय योजनांची माहिती जनतेला व्हावी आणि त्या माध्यमातून जनतेला लाभ मिळावा यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमागे १ व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागे एक असे एकूण ५० हजार योजनादूत राज्यात नेमण्यात येणार आहेत. यांचेही विद्यावेतन या योजनेतून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना ही युवांना कुशल, अर्धकुशल प्रकारचे प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यास उपयुक्त ठरणार असून राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल.

**-जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**

---

# विनोदासह कारुण्याची झालर असलेला 'विदूषक'

वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज लिखित विदूषक या नाटकाचा प्रयोग आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकताच सादर करण्यात आला. शिरवाडकरांची एक सुंदर नाटचकृती पाहण्याची संधी या निमित्ताने नाट्यरसिकांना मिळाली.

तसं पाहता हे नाटक फार जुने आहे. ५० वर्षापूर्वी चंद्रलेखा या प्रसिद्ध नाट्यसंस्थेने हे नाटक रंगभूमीवर आणले. या नाटकाचे जवळपास ५० प्रयोग झाले होते. त्यानंतर हे नाटक पुन्हा रंगभूमीवर आले नाही. रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, अलिबाग या परिसरातील हौशी रंगभूमी कलावंतांना घेऊन पुन्हा हे नाटक रंगभूमीवर आणण्याचे धाडस निर्माती साधना गंभीर यांनी केले आहे. याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.



या नाटकाचे थोडक्यात कथानक रायसाहेब हे एक श्रीमंत उद्योजक बारमध्ये संध्याकाळी दारू प्यायला जातात. तेथील वेटर बगा राम (अर्थात विदूषक) याचा मिश्किल स्वभाव त्यांना फार आवडतो. ते त्याला 'उद्या ऑफिसला ये तुला नोकरी देतो असे आश्वासन देतात.' बगा राम दुसऱ्या दिवशी ऑफिसला जातो. रायसाहेब त्याला ओळखत नाही. उलट त्याला हाकलून देतात. रात गई.. बात गई.. अशी त्यांची वृत्ती असते. या दरम्यान बगारामची एका आंधळ्या मुलीशी ओळख होते. त्या ओळखीचे रूपांतर प्रेमात होते. ही प्रेम कहाणी रंगत जाते. पुढे त्या प्रेम कहाणीचे काय होते..? दोघांचे लग्न होते का...? तिला दृष्टी प्राप्त होते का...? रायसाहेबांचे दारूचे व्यसन सुटते का...? या सर्व प्रश्नांची उत्तरे आपणांस हे नाटक पाहिल्यावरच समजतात. यासाठी हे नाटक पाहणे आवश्यक आहे.

या नाटकातील आंधळी नायिका अंजली हिची भूमिका सायली बोले हिने उत्कृष्टरित्या साकारली आहे, तर बगाराम अर्थात विदूषक शिवम पाटील यांनी या भूमिकेत जीव ओतून काम केले आहे. त्यांनी हलक्या पुलक्या विनोदाची पेरणी करुन कारुण्याची झालर असणारे असणारे पात्र उभे केले आहे. रायसाहेब ही व्यक्तिरेखा गंभीर पाटील यांनी साकारली आहे. त्यांनी या भूमिकेत रंगत आणली आहे. दारू प्यायलेली माणसाची व्यक्तिरेखा साकारणे सोपे काम नाही. त्याला अभिनयाची कास लागते. याशिवाय सेक्रेटरी विकास पवार, शिपाई राहुल राक्षे, वेटर गौरव म्हात्रे, छोटी मुलगी आराध्या, पोलीस रोहित शिंदे आणि बार मॅनेजर दत्ता ढोले हे पनवेलचे रहिवासी तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकारणी सदस्य या सर्वांनी आपल्या भूमिका योग्य रितीने पार पाडल्या आहेत. दिग्दर्शन गंभीर पाटील यांचे, तर नेपथ्य साहित्य संघ गिरगाव मुंबई यांचे आहे.

हलक्या फुलक्या विनोदासह कारुण्याची झालर असलेला 'विदूषक' पाहिल्याचे समाधान घेऊन नाट्यरसिक नाट्यगृहातून बाहेर पडतात. नाट्यरसिकांनी आवर्जून पाहावे असे हे नाटक आहे.

**-दिलीप रेडकर, पनवेल**

## निवडक

### सर्प दिनानिमित्त मार्गदर्शन

**रोहे :** एम.बी.मोरे फाउंडेशनचे कला वाणिज्य विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) विभाग आणि सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था, रायगड यांनी संयुक्तीकपणे जागतिक सर्पदिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी १८ जुलै रोजी मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले. सापाच्या विविध जाती, त्यांचे खाद्य, सापांच्या जातींचे संवर्धन यावर मार्गदर्शन केले. ही संस्था रायगड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग म्हणूनही कार्यरत आहे त्यामुळे मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित उद्भवणाऱ्या आपत्ती पासून विस्तळीत होणारे मानवी जीवन तसेच वन्य जीवन यांचे संरक्षण कसे करावे याचे प्रशिक्षणदेखील देण्यात आले.

### स्त्री आरोग्यविषयी व्याख्यान

**रोहे :** एम बी मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयात शुक्रवारी 'महिला सक्षमीकरण कक्षा'तर्फे स्त्री आरोग्यविषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'वुई आर मोअर' या खाजगी कंपनीच्या संचालिका करुणा चव्हाण आणि त्यांच्या सहकारी मनीषा जाधव यांनी महिलांचे आरोग्य आणि मासिक पाळीदरम्यानच्या समस्यांचे निरसन केले. यांवर उपलब्ध केलेल्या कंपनीच्या उत्पादनांची माहिती दिली आणि प्रात्यक्षिकेदेखील सादर केली. महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्षाच्या प्रमुख प्रा दिपाली वारंगे, प्रा. ममता बिंद, प्रा. सुनीला आंग्रे, प्रा विवेका देशमुख आणि ९२ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### नेने महाविद्यालयात वृक्षारोपण

**पेण :** भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे कॉलेजच्या क्रीडांगणाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम झाला. उद्घाटन कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या मेनन मॅडम यांनी केले. मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. तुकाराम माळवे, डॉ. सुभाष लकडे तसेच वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका व कार्यक्रम समन्वयक महिला कार्यक्रम अधिकारी सायली पितळे आणि वैदेही जोशी यांनी केले. महाविद्यालयाच्या क्रीडांगणाच्या परिसरात विविध प्रकारचे फळझाडे तसेच इतर वृक्ष लावण्यात आले. विद्यार्थ्यांना पर्यावरण समतोल, तसेच वृक्षारोपण व संवर्धन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.



# खोपोलीतील कचरा समस्या डोकेदुखी

## पालिका प्रशासनाविराधोत आंदोलन उभारण्याचा इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील कचरा संकलन नगर परिषदेप्रमाणे खोपोलीकरांची डोकेदुखीचा विषय ठरला आहे. शहराच्या बहुतांश भागात अनेक मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणात कचरा टाकलेला आढळून येत आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करावी; अन्यथा खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या वतीने नगर परिषद कार्यालयात कचरा फेक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समितीच्या वतीने नगर परिषद प्रशासनाला देण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन अलीकडेच आरोग्य विभागाला देण्यात आले आहे.

खोपोली पालिकेच्या महात्मा फुले मंडईचा दररोज मोठ्या प्रमाणात भाज्यांचा टाकाऊ कचरा मुंबई-पुणे महामार्गाच्या बाजूला टाकण्यात येत असल्याने प्रचंड प्रमाणात या भागात दुर्गंधी पसरते. याबाबत अनेकदा नागरिकांनी पालिका प्रशासनाला तक्रारीही दिले आहेत, तर मंडईतील व्यापाऱ्यांनाही कचरा संकलन करण्याबाबतच्या नगर परिषदेने सूचना देऊनही व्यापारी मंडळी कुठेही कचरा टाकत आहे. मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांनी अनेकदा ही बाब समाजमाध्यमांवर टाकली होती त्याबाबतही खोपोलीकरांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

दरम्यान, खोपोलीच्या विविध भागात उघड्या जागेवर कचरा टाकण्यात येतो याबाबत आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले की, घंटागाडी प्रत्येक प्रभागात जाते, मात्र नागरिक घंटागाडीत कचरा टाकत नसून उघड्यावर कचरा टाकत असल्याने हा प्रश्न उद्‌भवत आहे. लवकरच मंडईजवळ कचऱ्याची एक गाडी उभी करण्यात येईल त्यातच व्यापाऱ्यांनी कचरा टाकावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या वतीने आरोग्य खात्याप्रमुखांची याचसंदर्भात बैठक झाली त्यावेळीही समितीने अधिकाऱ्यांना अंतिम इशारा दिला होता. त्यातूनही अद्याप कुठलाही तोडगा निघाला नसल्याने आता नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी यांच्या दालनात कचरा फेक आंदोलन करणार याची अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी, असा इशारा संघर्ष समितीचे डॉ. शेखर जांभळे यांनी दिला.

दरम्यान, महात्मा फुले मंडईजवळ जमणाऱ्या कचऱ्याबाबत सोमवारपर्यंत निश्चित तोडगा काढण्यात येईल, अशी प्रतिक्रिया आरोग्य विभागाचे प्रमुख तथा उपमुख्य अधिकारी गौतम भगले यांनी दिली.



## उद्यापासून शिक्षण सप्ताह

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चौथ्या वर्धापन दिनानिमित्त २२ ते २८ जुलै २०२४ या कालावधीत शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव यांनी दिली आहे.

शिक्षण सप्ताहात आठवड्याचा प्रत्येक दिवस एका विशिष्ट उपक्रमासाठी नियोजित करण्यात आला असून ज्यात शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे. हा शिक्षण सप्ताह विद्यार्थी, शिक्षक, धोरणकर्ते व भागधारक यांच्यामध्ये सहकार्य वाढविणारा ठरणार आहे. रायगड जिल्ह्यामधील शाळांमध्ये उपक्रम राबविण्यात येणार आहे.

शिक्षण सप्ताहामध्ये पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सोमवार, २२ जुलै २०२४ रोजी, अध्ययन अध्यापन साहित्य दिवस. मंगळवार, २३ जुलै २०२४ रोजी, मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस. बुधवार, २४ जुलै २०२४ क्रीडा दिवस, गुरुवार, २५ जुलै २०२४ रोजी सांस्कृति दिवस, शुक्रवार, २६ जुलै २०२४ रोजी कौशल्य व डिजीटल उपक्रम दिवस, शनिवार, २७ जुलै २०२४, रोजी मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब, शालेय पोषण दिवस, रविवार, २८ जुलै २०२४, रोजी समुदाय सहभाग दिवस.

याप्रमाणे शिक्षण सप्ताह अंगणवाडी केंद्रामध्येदेखील राबविण्याबाबत सूचित केले आहे. जिल्ह्यामध्ये शिक्षण सप्ताहाची सर्व व्यवस्थापनांच्या सर्व मंडळाच्या शाळांनी यशस्वीरित्या अंमलबजावणी करावी, असे आवाहनही शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव यांनी केले आहे.

## ओंकार विद्यामंदिरात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील हिंदु एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदीर येथे विद्यार्थ्यांना भारतीय जनता पार्टीचे कार्यकारणी सदस्य जनार्दन (अण्णा) कंधारे यांनी आयोजित केलेल्या वह्या वाटप कार्यक्रमात प्रमुख अतिथी रायगड जिल्हा भाजप उपाध्यक्ष दिलीप भोईर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वहया वाटप करण्यात आले.



या वेळी हिंदु एज्युकेशनचे विश्वस्त मनोहर गुरव, दिलीप दांडेकर, सुनील विरकुड, दीपाली जोशी, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भोईर, मुरूड तालुका सुपारी संघाचे संचालक जनार्धन कंधारे, मुरूड तालुका भाजप उपाध्यक्ष स्वप्निल चव्हाण, नरेश वारगे, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष निमिष वाघमारे, महेंद्र चौलकर, विनोद भगत, प्रवीण बैकर, सुधीर पाटील, माजी तहसीलदार नयन कर्णिक आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्ह्याचे उपाध्यक्ष व माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर आपल्या भाषणात म्हणाले की, जनार्धन कंधारे गेल्या ९ /१० वर्षांपासुन ओंकार विद्या मंदीराला शैक्षणिक साहित्य वाटप करून सहकार्य करीत असल्या बद्दल त्यांच्या दातृत्वाला सलाम केला.

त्याचबरोबर येथील महिला अध्यापक वर्ग अत्यंत सेवाभावी वृत्तीने केवळ मानधनावर काम करीत असून युवा पिढीला सुसंस्कारीत करण्याचे मोलाचे कार्य करीत असल्याचा आवर्जुन उलेख केला. खारीचा वाटा म्हणून या संस्थेला प्रस्तावित सुमारे १६ लाख रुपये किंमतीच्या दोन वर्ग खोल्या बांधुन देण्याची घोषणा या वेळी त्यांनी केली. येत्या १५ ऑगस्टपूर्वी कामाचा शुभारंभ करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## चोरांना पकडून देणाऱ्या आजीचे कौतुक

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नाभिक समाजाचे ज्येष्ठ नेते काकासाहेब माने यांच्या सुनबाई नम्रता महेंद्र माने यांच्या मातोश्री ठाणे जिल्ह्यातील कळवा-खारेगाव येथील गीता तुळशीराम पवार या ७२ वर्षीय धाडसी आजीने गुरुवारी (दि. १८) तिचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या चोरांना पोलिसांच्या मदतीने पकडून दिले. आरोपीकडून पोलिसांनी आजीची साधारण ८०,००० किमतीची सोन्याची एक बांगडी हस्तगत केली.



मिळालेल्या माहितीनुसार गीता पवार आजी गुरुवार १८ जुलै रोजी सायंकाळी खारेगाव येथून दत्तवाडी येथील स्वामी समर्थ मठात जाण्यासाठी बस स्टॉपवर उभ्या होत्या. त्यांच्या हातात साधारण पाच तोळ्याच्या दोन बांगड्या असल्याने बस स्टॉपवर उभे असलेल्या चोरांची त्यावर नजर गेली. ठाणेकडे जाणारी टी.एम.टी. बस आली त्यावेळी आजी बसचे मागील दाराने बसमध्ये चढत असताना खुप गर्दी होती. त्यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी मला आजी इकडून या, इकडे बसमध्ये जाण्याकरीता जागा आहे असे बोलून आजीला बोलावले त्यावेळी आवाज देणारे आजीला बोलण्यात गुंतवून ती बसचे मागील दारातून आत चढत असताना तिच्या उजव्या हातातील सोन्याची बांगडी कोणत्या तरी साधनाने कापून लबाडीने लंपास केली. आजीच्या ते लक्षात आले त्याचवेळी बस चालू झाली त्यावेळी आजीने आरडा ओरडा केल्याने बस काही अंतरावर जावून थांबली, खाली उतरल्यावर बाहेर गस्तीवर असणारे पोलीस (बिट मार्शल) तेथून जात असताना त्यांना घडलेला प्रकार आजीने सांगितला.

तत्परतेने पोलिसांनी आजीला सोबत घेऊन घटना घडली त्याठिकाणी खारेगाव नाका, टी.एम. टी. बसस्टाप जवळ आणेपर्यंत आजी वाटेत चोरांना शोधत होती. त्यांना बस स्टॉपवर आणल्यानंतर आजी परत येणार नाही आता दूसरा सावज शोधण्याच्या विचारात ते चोर तिथेच एका बाजूला उभे होते. तत्काळ आजीने त्यावेळी आवाज देणारे व हातातून सोन्याची बांगडी चोरी करणारे दोन्ही अनोळखी व्यक्ती त्याच ठिकाणी उभे असल्याचे आजीने पोलिसांना सांगितले. पोलीस जवळ येतात हे बघून त्या व्यक्तींनी पलायन केले, पण पोलिसांनी त्यांचा पाठलाग करत दोन चोरांना पकडण्यात यश मिळविले.

पोलिसांना दोन्ही अनोळखी व्यक्तींना ताब्यात घेऊन कळवा पोलीस स्टेशन येथे आणले व त्यांच्याकडून आजीची साधारण ८०,००० रुपये किंमतीची सोन्याची एक बांगडी हस्तगत केली. चाणाक्ष आजीची सतर्कता व धाडसामुळे चोर सापडल्याने कळवा - खारेगाव परिसरातून आजीचे कौतुक व त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## माणगावात विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप आयोजित समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि.१४) कुणबी भवन माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्याहस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. यावेळी समाजातील ६० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या दहावी व बारावीतील १००हुन अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या गुणगौरव सोहळ्यात मार्गदर्शन करताना माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी सुरुवातीलाच कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते स्व. बाबुराव भोनकर यांच्या समाजकार्याला उजाळा दिला.

अध्यक्षीय मार्गदर्शनात भागोजीबुवा डवले यांनी सांगितले कि, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना ध्येय नजरेसमोर ठेवून शिक्षण घ्या. आपण चांगले शिक्षण घेतले तर याची दखल निश्चितच समाज घेत असतो. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात समाजासाठी काम करायला पुढे यावे, असे आवाहन केले.

या वेळी माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे खजिनदार रामभाऊ टेंबे, सरचिटणीस शांताराम भोरावकर, सदस्य काका नवगणे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष काशीराम पाखुर्डे, सदस्य नितीन खडतर, मंडळाच्या तालुका महिला आघाडी अध्यक्षा नीता करकरे यांनीही उपस्थित विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





## पावसामुळे वरवठणे पूल पाण्याखाली

**नागोठणे : बातमीदार**

संततधार पावसामुळे शनिवारी पहाटे पुन्हा नागोठणे येथील अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. यात ऐतिहासिक वरवठणे पूल पाण्याखाली गेला. यामुळे वरवठणे गावाचा नागोठणे गावाशी संपर्क तुटला असून एसटी स्टॅन्ड परिसर, रिक्षा स्टॅन्ड परिसर, मांडलेकर गल्ली, अर्धा कोळीवाडा तसेच हॉटेल लेकव्ह्यू परिसरात पूर परिस्थिती निर्माण झाली.



या पूर परिस्थितीकडे महसूल खाते, ग्रामपंचायत प्रशासन व पोलीस प्रशासन लक्ष देऊन आहेत तसेच नागरिकांना सावधानतेचा इशारादेखील देण्यात आला आहे. दरम्यान, १४ जुलै रोजीदेखील नागोठणे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती त्यावेळी नागरिक व व्यापारी वर्गाची चांगलीच तारांबळ उडाली होती.

पुराच्या पाण्यापासून बाजारपेठ परिसर सुरक्षित असला तरी या पूर परिस्थितीबाबत व्यापारी दक्ष आहेत. वरवठणे पुलावरून अंबा नदीचे पाणी गेल्यामुळे एस.टी. स्टॅन्डमध्ये पाणी शिरले असल्याने एस.टी. बस हायवेनाका येथे वाळविण्यात येत असून प्रवासी वर्ग हायवेनाक्यावरून आपल्या पुढील प्रवासासाठी एस.टी. बस किंवा अन्य वाहनाने जात आहेत.

दरम्यान, पावसाचा जोर वाढत गेला तर बाजारपेठ व इतर परिसरातदेखील पाणी शिरले जाऊ शकते त्यामुळे नागरिक व व्यापारीवर्गाला सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

## 'माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या ऋणात कायम राहावे'

**धाटाव : प्रतिनिधी**

मुख्यतः ग्रामीण भागातील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या ऋणात कायम राहावे. शाळा, विद्यालय व सामान्य विद्यार्थ्यांना नेहमीच पाठबळाची गरज असते विविधता गरज माजी विद्यार्थ्यांनी पूर्ण करावी, असेच जाणीवेचे काम विद्यालयाचे माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी पूर्ण केले, असे गौरोद्गार पत्रकार राजेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.



वरदायिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी पत्रकारांनी ग्रामीण भागातील शालेय मुलांशी मार्गदर्शनपर संवाद साधला. त्यातून मुलांनी आनंद व्यक्त केला. तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागावचे माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी सहयोगी माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. शुक्रवारी आयोजित वरदायिनी विद्यालयातील विद्यार्थी संवाद कार्यक्रमाला महुरे येथील सामाजिक कार्यकर्ते जयवंत जाधव, पत्रकार राजेंद्र जाधव, रवींद्र कान्हेकर, उध्दव आव्हाड, पोलीस संघटनेचे माजी पदाधिकारी कमलाकर मांगले, मुख्याध्यापक तुकाराम व्यवहारे, व शिक्षक वृंद उपस्थित होते.

ज्या गावात आपले बालपण गेले, ज्या शाळेत शिकतो, त्या शाळेला कधीच विसरता कामा नयेत. अधिक दुर्गम भागातील विद्यालये विविध अडचणीत असतात. सामान्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, पाठबळाची गरज असते. ती गरज, सामाजिक बांधिलकी माजी विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे. वरदायिनी विद्यार्थ्यांमध्ये माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी ही जाणीव ठेवत विद्यार्थ्यांना परिपूर्ण शैक्षणिक साहित्य दिले हे कौतुकास्पद आहे. असे सांगत राजेंद्र जाधव यांनी मुलांशी हसत खेळत संवाद साधला. विद्यार्थी, विद्यालयाला सहकार्य करू असेही जाधव यांनी सांगितले. यावेळी मुख्याध्यापक तुकाराम व्यवहारे यांनी मान्यवरांचे आभार मानले.

## खोपोलीत स्वच्छता अभियानास प्रारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत शहरात आयसीटी बेस प्रणालीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १९) मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या उपस्थितीत नगरपरिषद कार्यालय करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने निगरमित शासन निर्णयाच्या अनुषंगाने दैनंदिन घनकचरा संकलनाच्या मांडणी ट्रेनिंगसाठी आयसीटी बेस प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. या अंतर्गत शहरातील मालमत्ता वर तसेच द्वारे ओला व सुका कचरा साठवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दसवींवर विशिष्ट कोड लावण्यात येणार आहे कचरा संकलन कर्मचाऱ्यांद्वारे केल्यानंतर कोड स्कॅन केले जातील ही सेवा निशुल्क सेवा असल्याचे अभियान प्रमुख पवन लंगडे यांनी या वेळी सांगितले.

हे अभियानाच्या उद्घाटनावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी सांगितले. या शासनाच्या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी आपले शहर स्वच्छ ठेवण्याबाबत सर्वांनी एकत्र येऊन या अभियानात सहभागी होऊन शहर स्वच्छ ठेवूया. त्यांनीही या आयटीसी बेस या प्रणालीद्वारे कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबतची माहिती दिली सर्व नागरिकांनी या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन केले.

नगर परिषदेचे आरोग्य विभागाचे प्रमुख तथा उपमुख्य अधिकारी गौतम भगळे, या अभियानाचे रुपेश मिस्त्री, आरोग्य सुपरवायझर विशाल गोयल व इतर मान्यवर उपस्थित होते.


## निवडक

### सवणे येथे घरफोडी; गुन्हा दाखल

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सवणे गावात घरात चोरी झाल्याची घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. फिर्यादी अनंता रामभा देशमुख (वय ७४) यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी बंद घराच्या दवाजाचे कडीकोयंडा तोडून बेडरूममधील कपाट फोडून त्यातील ३५ हजार रूपये चोरट्याने चोरून नेले आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई धोंडे, तपासिक अंमलदार चौरे व मपोना शेळके अधिक तपास करीत आहेत.

### स्वामी समर्थ मठात गुरूपौर्णिमा

**पनवेल :** शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे सालाबादप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमा उत्सव सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमाद्वारे होणार आहे. त्यामध्ये पहाटे श्रींची काकड आरती, नित्य नैमित्यिक पुजा प्रसाद, लघु रुद्र पुजा, श्रींची आरती व प्रसाद, श्री दत्त गायत्री होम हवन, सद्गुरु पाद्य पुजा आदी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे येणाऱ्या स्वामी भक्तांसाठी व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था आगरी समाज हॉल पनवेल येथे करण्यात आल्याची माहिती निमंत्रक प.पु.सुधाकर (भाऊ) घरत व अवधूत सुधाकर घरत यांनी दिली आहे.



### पनवेलमधून गाडीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन येथील एनएमएमटी बस स्टँण्डच्या समोर उभी करून ठेवलेली मारुती सुझुकी गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. प्रदीप मुकादम यांनी त्यांची पाच लाख रुपये किंमतीची मारुती सुझुकी कंपनीची पांढरी (एमएच–४६–बीझेड–७४६०) गाडी पनवेल रेल्वे स्टेशन येथील एनएमएमटी बस स्टँण्डच्या समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सुकापुर परिसरातून दुचाकीची चोरी

**पनवेल :** स्कुटी पार्क करून शॉपिंग करण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्याने स्कुटी गाडी चोरून नेल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. दानिश पठाण हे प्रयाग सिटी, विहिघर गाव येथे राहतात. त्यांनी स्कूटी कामाच्या ठिकाणी कामोठे येथे घेऊन गेले. काम आटपून ते स्कूटी घेऊन आले आणि सुकापुर येथे रस्ता क्रॉस करून सुकापूर गावात जाणाऱ्या रस्त्याला लागून असलेल्या राम मंदिराच्या बाजूला स्कूटी उभी केली. बॅग स्कूटीला अडकवून ते शॉपिंग करायला गेले. शॉपिंग करून झाल्यावर स्कूटी पार्क केलेल्या ठिकाणी घेण्यास गेले असता स्कूटी दिसून आली नाही. तिचा आजूबाजूला शोध घेतला मात्र सापडली नाही. त्यामुळे (एमएच ४६ सीजे २०३६) मोटरसायकल चोरीला गेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवी मुंबईच्या गावठाण विभागात स्वच्छता

## सफाई अपनाओ–बिमारी भगाओ अभियानाची अंमलबजावणी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमधील मानांकन उंचावण्याचा ध्यास घेऊन स्वच्छ सर्वेक्षणाला सामोरे जाताना नवी मुंबई महापालिका नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून स्वच्छता उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशनने जाहीर केलेल्या 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेने सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात व्यापक प्रमाणात सखोल स्वच्छता मोहिमा राबविण्यास सुरुवात केली असून त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांपासून विदयार्थ्यांपर्यंत आबालवृध्द नागरिक उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येते. या अनुषंगाने आठही विभाग कार्यालय क्षेत्रात वर्दळीच्या तसेच काहीशा दुर्लक्षित ठिकाणांवर एकाच वेळी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यास सुरुवात झाली आहे.

यानुसार गुरुवारी सर्व विभाग कार्यालय क्षेत्रातील गावठाण भागांमध्ये व काही गावठाणांलगतच्या भागांमध्ये स्थानिक नागरिकांच्या सहभागातून सखोल स्वच्छता मोहीमा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात आल्या.



यामध्ये बेलापूर विभागात दिवाळे गाव, नेरूळ विभागात शिरवणे गाव, वाशी विभागात जुहू गाव, तुर्भे विभागात तुर्भे गाव, कोपरखैरणे विभागात महापे हनुमान नगर, घणसोली विभागात कातकरीपाडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, ऐरोली विभागात यादव नगर व दिघा विभागात संजय गांधी नगर भागात सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या.

यामध्ये स्थानिक नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होत आपल्या परिसराच्या स्वच्छतेसाठी सक्रीय योगदान दिले. या वेळी महापालिकेच्या स्वच्छता अधिकाऱ्यांच्या वतीने नागरिकांना कचरा वर्गीकरणाचे तसेच एकल प्लास्टिक वापराच्या प्रतिबंधाचे महत्व पटवून देण्यात आले. या वेळी सर्वांनी सामुहिकपणे स्वच्छतेची, पर्यावरण संर्वधनाची व एकल वापर प्लास्टिक न वापरण्याची शपथ घेतली. अशाच प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा सर्वंच गावठाण क्षेत्रामध्ये राबविण्यात येणार असून गावठाण भागातील नागरिकांमध्ये या मोहीमांमध्ये सहभागी करुन घेतले जाणार आहे.

या मोहीमांचे सर्व विभागांचे सहा आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ अमोल पालवे, सागर मोरे, भरत धांडे, सुनील काठोळे, संजय तायडे, अशोक अहिरे, डॉ. कैलास गायकवाड यांनी स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षकांसह सुयोग्य नियोजन केले.

याशिवाय घणसोली विभागात सहा आयुक्त तथा विभाग अधिकारी संजय तायडे, स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्यासह स्वच्छता निरीक्षक व अधिकारी–कर्मचारी यांच्या माध्यमातून मदर टेरेसा स्कूल सेक्टर ५ व नमुंमपा शाळा क्रमांक ४२ यांच्या सहयोगातून घणसोली विभागात स्वच्छता व वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये स्वच्छतेसह वृक्षारोपण व संवर्धन, प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करणे, कचऱ्याचे ओला सुका व घातक असे घरापासूनच वर्गीकरण करणे अशा विविध महत्त्वाच्या बाबींवर घोषवाक्य लिहिलेले फलक उंचावत, घोषणा देत विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

अशाच प्रकारचा उपक्रम कोपरखैरणे विभागात नमुंमपा शाळा क्रमांक १०६ यांच्यासह सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनील काठोळे तसेच स्वच्छता अधिकारी राजुसिंग चव्हाण यांच्या पुढाकारातून शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थी यांच्या सहभागातून राबविण्यात आला तसेच नेरूळ सेक्टर ३ येथील रोज बाजार या ठिकाणी सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ अमोल पालवे, स्वच्छता अधिकारी अरुण पाटील तसेच स्वच्छता निरीक्षक व अधिकारी–कर्मचारी यांनी तेथील व्यावसायिकांचे प्लास्टिक बंदीविषयी प्रबोधन केले तसेच या वेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

### विद्यार्थ्यांनी केले पथनाट्य सादरीकरण

मोहिमेवेळी स्टर्लिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादरीकरण करत स्वच्छता व प्लास्टिक प्रतिबंधाविषयी जनजागृती केली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईत ठिकठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत असून त्यामध्ये नागरिक व विशेषत्वाने विद्यार्थी स्वयंस्फुर्तीने मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन प्रोग्राम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१९) विज्ञान, माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.

या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील तिन्ही शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाविद्यालयात घेतले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, प्लेसमेंट ड्राईव्ह, वेगवेगळ्या नामांकित संस्थांबरोबर असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे माहितीचे आदान–प्रदान याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.



या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे शास्त्र विभाग प्रमुख, प्रा. राजश्री म्हात्रे माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख, प्रा. रिजवाना मोमीन कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख यांनी केले तसेच तिन्हीही विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# पर्समधील दागिन्यांची चोरी

**पनवेल : अलिबाग ते पनवेल** बसमधून पनवेल बस स्टॉप येथे उतरत असताना ५५ वर्षीय महिलेकडील लहान पर्समध्ये ठेवलेले दागिने चोरट्याने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कल्पना महेंद्र पाटील ह्या वडवली, ताडवागळे येथे राहतात. त्या पोयनाड बस स्टॅन्ड येथून अलिबाग ते पनवेल बस ने ठाणगेवाडी, कल्याण येथे जात होत्या. ही बस पावणेचार वाजता पनवेल बस स्टॉप येथे थांबली. या वेळी प्रवाशांची गर्दी होती. त्या खाली उतरून पनवेल येथील बिकानेर स्वीट मार्ट येथे खाऊ घेत असताना पैसे काढू लागल्या. यावेळी त्यांना मोठ्या पर्समधील सोन्याचे दागिने ठेवलेली सफेद लहान पर्स दिसून आली नाही.

या वेळी पर्स आतमध्ये असेल म्हणून त्यांनी शोधाशोध केली नाही. त्यानंतर त्या बहिणीकडे गेले असता त्यांनी पर्स तपासून पाहिली. या वेळी लहान पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने सापडून आले नाहीत. पनवेल बस स्टॉप येथे उतरताना चोराने सहा लाख तीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

# नमुंमपा कर्मचाऱ्यांना ई–ऑफिस कार्यप्रणालीचे विशेष प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कामकाजात ई–ऑफिस कार्यप्रणाली राबविण्याबाबत जलद पावले उचलण्यात येत असून त्यादृष्टीने अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे.

मुख्यालयातील ज्ञानकेंद्र येथे हे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले असून एनआयसी या शासकीय संस्थेमार्फत ई–ऑफिस प्रणालीचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांनी ई–ऑफिस कार्यप्रणालीमुळे आपल्या कार्यालयातील पत्रव्यवहार, कागदपत्रे, टिपण्या, नस्तींच्या नोंदी आदी सर्व कामकाज संगणकीय रितीने होणार असून याव्दारे नस्ती व कागदपत्रे शोधण्यातील वेळ वाचेल, असे सांगितले.

ई–ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करून नवी मुंबई महापालिकेच्या कामकाजाला गती देण्यात येत असून ऑगस्ट महिन्यापासून महापालिकेचे कार्यालयीन कामकाज पेपरलेस होईल यादृष्टीने नियोजनबध्द कार्यवाही करण्यात येत आहे.



# योगा प्लॅटफॉर्म, निवारा शेडचे उद्घाटन

**नवी मुंबई :** बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधीमधून २० लाख रुपये उपलब्ध करून बेलापूर सेक्टर १५ येथे कै. नागा गणा पाटील उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या मागणी नुसार योगाकरिता प्लॅटफॉर्म (निवारा शेड) आणि एक योगा केंद्र स्थापन झाले याचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक दीपक पवार, माजी भाजप जिल्हाध्यक्ष सी.व्ही.रेड्डी, ज्येष्ठ नागरिक जी.एल.करणानी, गोपालराव गायकवाड, के.के. मेहता, सी.डी.गुप्ता, एम.एम. शर्मा, हरी गोपाल, डी.के. शर्मा, शिवाजी पाटील, जी.बी बडोला, दिलीप कोकाटे, विनय तांबे, पांडुरंग कोळी, तुकाराम कोळी, चंद्रकांत कोळी, शैलजा पाटील, ज्योती पाटील, लीला गजरे, मीना टेकचंदानी, पूजा सिंग, सुधा चंद्रा, अनुराधा, चंद्रभागा भोईर, चंदकांत पाटील आदी उपस्थित होते.

# सार विचार पुस्तकाचे प्रकाशन

## आग्रोळीतील सुधीर पाटील यांचे लेखन

**नवी मुंबई : बातमीदार**

आग्रोळी गावातील सुधीर पाटील यांच्या सार विचार या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा माजी विरोधी पक्षनेता दशरथ भगत यांच्या हस्ते अग्रोली येथील कॉ. बी. टी. आर भवन ग्रंथालय येथे झाला. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक हायस्कूलचे माजी प्राचार्य सोनावणे होते.

सार विचार हे पुस्तक आज युवकांना प्रेरणादायी ठरणारा असून मोठ मोठी ग्रंथ पोथी वाचन्यास आज कुणालाही वेळ नाही. सर्व धर्मग्रंथाचा सार या पुस्तकरुपी पुस्तकात आहे. आपण वाचन कला आत्मसात केल्यास भविष्यात काहीतरी जीवनात करू शकता त्यासाठी आजच्या युवकांना वाचन हे गरजेचे असल्याचे दशरथ भगत यांनी सांगितले. पुस्तक प्रकाशनाला उपस्थित नवी मुंबई पालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे म्हणाले की पुस्तकांच्या पंढरीत जमलेल्या सोहळ्याला आपण जमलो आहोत असंच म्हणावे लागेल सुधीर पाटील यांच्यात लेखक आहे. छोटी छोटी वाक्यरचना पाठवीत होते. ज्या पद्धतीने व पु काळे यांच्या वपूर्जा पुस्तकासारखे असेच म्हणावे लागेल, अशी माहिती तुमच्या आमच्या जीवनात सध्याच्या काळात मिळत नसल्याचे कोंडे यांनी सांगितले.




आपल्या प्रास्ताविक बद्दल बोलतांना सुधीर पाटील म्हणाले की, सार विचार मध्ये अध्यात्मिक, ऐतिहासिक, निसर्ग, संसारिक, व चालु घडामोडीवर लिहिलेल्या आहेत.

# बेलापुरात जनसंवाद कार्यक्रमाला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष जनसंपर्क कार्यालयात भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांचा शुक्रवारी जनसंवाद उपक्रम झाला. त्याला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बेलापूर शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून आपल्या विविध प्रश्नांची सोडवणूक केली.



बेलापूर सेक्टर १५ येथील या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ज्या बहुसंख्य निवेदनांवर लगेचच कार्यवाही करणे शक्य आहे त्यांचा निपटारा करण्यात आला. उर्वरित निवेदनांची कालबद्ध पद्धतीने पाठपुरावा करून सोडवणूक करण्यात येणार आहेत.

या जनसंपर्क कार्यालयामधून शासकीय योजनांची माहिती देणारा कक्ष सुरू होणार आहे. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करीत असून आगामी काळात जास्तीत जास्त वेळ जनसंपर्क कार्यालयामध्ये उपलब्ध राहणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी सांगितले.

# पनवेल शहर आणि तालुका पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणे तसेच पनवेल तालुका पोलीस ठाणे अंतर्गत काम करणाऱ्या तसेच कार्यकाळ संपलेल्या अधिकारी वर्गांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत तसेच त्या जागी इतर विभागातील अधिकारीसुद्धा आले आहेत.

यामध्ये प्रामुख्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी बाळकृष्ण सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते यापूर्वी पिंपरी चिंचवड येथे कार्यरत होते. त्याचप्रमाणे नवी मुंबई येथे कार्यरत असणारे पोलीस निरीक्षक नंदू कदम यांची खारघर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बजरंग राजपूत यांची रबाळे पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांची उरण पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश फुले यांची नेरूळ पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

याचप्रमाणे मिलींद फडतरे यांची खारघर पोलीस ठाणे येथे बदली कण्यात आली आहे. तर गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे यांची गुन्हे शाखा येथे बदली करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र जगदाळे यांची मोरा सागरी येथे बदली करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगुले यांची कळंबोली पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे पोलीस उपनिरीक्षक गिरी यांची एसआरटी येथे बदली करण्यात आली आहे. गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक फडतरे यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

पोलीस उपनिरीक्षक कदम यांची सानपाडा येथून पनवेल शहर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. तर रबाळे एमआयडीसी येथील दीपक शेळके यांची तालुका पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त साखळी कीर्तन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्ताने नवीन पनवेल ब्राह्मण सभेच्या वतीने एका हरिदासी साखळी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. येथील कर्नाटक संघाच्या सभागृहामधे हा कार्यक्रम झाला. यामधे ह.भ.प. प्रशांत डोंगरे, ह.भ.प. सुखदा मुळ्ये–घाणेकर आणि ह.भ.प. श्रीनिवास काजरेकर यांची कीर्तनसेवा झाली. सतीश रानडे यांनी संवादिनी तर शार्दूल डोंगरे यांनी तबला साथ केली.

या कार्यक्रमाला आकाशवाणीच्या शास्त्रीय गायिका अनिता कुलकर्णी, गायक पं. मिलिन्द गोखले, युवा कीर्तनकार वर्षा रानडे–सहस्रबुद्धे, नाट्यदिग्दर्शक मोहन हिन्दुपूर आदी उपस्थित होते. 'हरी तुझी आवडी मजला देई' या पदाने कीर्तनाचा पूर्वरंग झाला. यामध्ये हरिभक्तीचे महत्त्व यावर निरुपण करण्यात आले. उत्तर रंगामधे गोपींच्या कृष्णभक्तीवर आधारित 'गोपीचंदन' आख्यान सांगण्यात आले. या वेळी सुखदा घाणेकर यांनी गायलेल्या रासगीतावर फेर धरण्याचा आनंद महिलांनी घेतला.

सुमधूर गायन, निरुपण आणि अनुरूप दृष्टांत, या त्रिगुणी संगमाने संपन्न झालेल्या कीर्तनाने सभागृहातील वातावरण भक्तिभावपूर्ण झाले. हा कार्यक्रम करण्यासाठी ब्राह्मण सभेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.



**साखळीकीर्तनाचा हा पहिलाच अभिनव प्रयोग आयोजित करण्याचे भाग्य आमच्या संस्थेला लाभले याचा आनंद वाटतो. उपस्थित भाविकानीही याचा भक्तिपूर्ण आनंद घेतला.**
**–दीपाली जोशी,**
**अध्यक्ष, ब्राह्मण सभा**

# श्रीवर्धनमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित

**श्रीवर्धन : बातमीदार**

पावसाळ्यात श्रीवर्धन शहरासह तालुक्यातील वीजपुरवठा सातत्याने खंडित होतो. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

श्रीवर्धन तालुक्यामध्ये मागील दोन आठवड्यांपासून मुसळधार पाऊस पडत आहे, मात्र काही काळ जोरदार सरी कोसळल्यानंतर पाऊस थोडीशी विश्रांती घेत असल्याने श्रीवर्धन शहरात पाणी तुंबण्याचे प्रकार घडत नाहीत. काही भागांमध्ये पाणी तुंबले तरी ओहोटी सुरू झाल्यानंतर पाणी तातडीने ओसरून जाते. श्रीवर्धन शहर हे समुद्राच्या कुशीत वसलेले गाव आहे. त्यामुळे वस्तीपासून समुद्रकिनारा अत्यंत जवळ आहे.

**नागरिक, पर्यटक त्रस्त**

पावसाळा सुरू झाला की, समुद्र मोठ्या प्रमाणात खवळलेला असतो व समुद्र खवळल्यानंतर पावसाची एखादी सर जरी आली, तरी सोसायट्याचा वारा सुटतो. काही वेळेला अपवाद वगळता वारा न सुटतादेखील पावसाची सर पडते. पावसाला सुरुवात झाल्यावर महावितरणचा वीजपुरवठा लागलीच खंडित होतो.

महावितरणकडून पावसाळा वगळता महिन्यातून दोन ते तीन वेळा देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो, तर पाभरे येथील विद्युत केंद्रापासून श्रीवर्धन येथील उपविद्युत केंद्रापर्यंत येणाऱ्या वीजवाहिन्या या जंगल मार्गातून येत असल्यामुळे त्यांच्या बाजूला वाढलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्यासाठीदेखील अनेक वेळा वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. एवढे सगळे खटाटोप करूनसुद्धा पावसाला सुरुवात झाल्याबरोबर वीजपुरवठा खंडित होतो. श्रीवर्धन, म्हसळे या तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती पाहता या ठिकाणच्या मुख्य विद्युतवाहिन्या या भूमिगत असणे आवश्यक आहे. श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटनाच्या दृष्टीने खूप मोठ्या प्रमाणात बहरलेला आहे. या ठिकाणी पर्यटक खूप मोठ्या प्रमाणात येतात. पावसाळ्यात पर्यटकांचे प्रमाण जरी कमी असले तरी पावसाळा संपल्यानंतर म्हणजेच साधारण गणेशोत्सव संपल्यानंतर या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात येण्यास सुरुवात होते.

शासनाच्या ऊर्जा विभागाने या ठिकाणच्या विद्युतवाहिन्या पूर्णपणे भूमिगत करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी या ठिकाणच्या नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### पर्यटनावरही परिणाम

मोठमोठ्या शहरातून येणाऱ्या पर्यटकांना वातानुकूलित खोल्यांमध्ये राहण्याची सवय असते. श्रीवर्धन शहरातील काही मोठी हॉटेल्स व रिसॉर्ट वगळता अन्य होम स्टे व छोट्या हॉटेल्समालकांकडे जनरेटरची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर त्या ठिकाणी येणारे पर्यटक नाराजी व्यक्त करतात.

# सागर ओसवाल यांच्याकडून चौक शाळेला दोन संगणक भेट

## आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य



**चौक : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे चौक शहर उपाध्यक्ष सागर जयंतीलाल ओसवाल यांच्याकडून सरनौबत नेताजी पालकर शाळेला दोन संगणक भेट देण्यात आले.

या कार्यक्रमास विद्या प्रसारणी सभेच्या कार्याध्यक्ष शोभा देशमुख, योगेंद्र शाह, शिक्षक कांबळे, माजी विद्यार्थी स्वप्नील मुकादम, संकल्प जोशी, शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी देशमुख व शाह यांनी आमदारसाहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व सागर ओसवाल यांचे कौतुक करून शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले.

# कारच्या खिडकीतून थुंकणाऱ्या प्रवाशाचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

कारच्या खिडकीतून थुंकण्यासाठी बाहेर डोके काढलेल्या बालाजी धनंजय नरहरे (वय ३५, रा. कात्रज, पुणे) या प्रवाशाला कंटेनरची धडक बसल्याने जीव गमवावा लागल्याची घटना मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर घडली.




बालाजी नरहरे बुधवारी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाने प्रवास करत असताना सकाळी पावणे अकराच्या सुमारास कार ढेकू गावाच्या हद्दीत फूड मॉलजवळ आली असताना बालाजी यांनी थुंकण्यासाठी कारच्या खिडकीची काच खाली करून डोके बाहेर काढले. त्याचदरम्यान कारचालक माधव राजाराम राठोडे (वय ४२, रा. धनकवडी, पुणे) याने सुसाट वेगात पुढे जाणाऱ्या कंटेनरला ओव्हरटेक करीत कट मारल्याने बालाजी यांचे डोके कंटेनरवर आदळले. बालाजी यांना गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी कारचालक माधव राठोडेविरुद्ध बालाजी यांच्या अपघातात आणि मृत्यूस कारणीभूत झाला, म्हणून खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर टेम्पोची ट्रकला धडक; चालकाचा होरपळून मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील शनिवारी (दि. २०) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास फुडमॉलजवळील तीव्र उतारावर अनियंत्रित झालेल्या टेम्पोने पुढील ट्रकला जोरदार धडक दिली. या अपघातात टेम्पोने पेट घेतल्याने संपूर्ण वाहन जळून खाक झाले. यात टेम्पोचालकाचा होरपळून मृत्यू झाला असून अन्य एक जखमी व्यक्तीस एक्सप्रेस वेवरील यंत्रणांनी मदतकार्य करून सुरक्षित बाहेर काढले. त्यास कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मृत चालकाचे शव बाहेर काढण्यात यश आले असून कोंबडी वाहतूक करणाऱ्या या टेम्पोची साखरेची वाहतूक करणाऱ्या ट्रकला मागून धडक बसली. या अपघाताची तीव्रता एवढी होती की क्षणातच टेम्पोने पेट घेतला. त्यामुळे मदतकार्य करताना खूप अडचण येत होती. अपघातात दोन्ही गाड्या जळून नुकसान झाले आहे. चालक जागेवरच जळाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघातात अजून एक जण जखमी झाला असून त्याच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, खोपोली नगरपालिका फायर ब्रिगेड, लोकमान्य हॉस्पिटलची ॲम्बुलन्स व्यवस्था यांनी महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट आणि खोपोली पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मदतकार्य पूर्ण केले.

अपघात मुंबईकडील शेवटच्या लेनवर झाला होता. त्यामुळे वाहतुकीला कोणतीच अडचण आली नव्हती. बाधित वाहने बाजूला काढून महामार्ग संपूर्णतः वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. हा अपघात खोपोली पोलीस ठाण्याच्या अंतर्गत झाला असून पोलीस या संदर्भात पुढील तपास व कार्यवाही करीत आहेत.

# चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरात गुरूपौर्णिमा उत्सव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरात रविवारी (दि. २१) गुरुपौर्णिमेचा उत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. यानिमित्त श्री दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्ट, अलिबाग या संस्थेच्या माध्यमातून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन चौल भोवाळे येथील दत्त टेकडीवरील श्री स्वामी समर्थांच्या मठामध्ये करण्यात आले असून, भाविकांना प्रसाद आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

श्री दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष महेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अन्नदान आणि प्रसादाच्या वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. श्री. मोरे यांच्या नेतृत्वात आतापर्यंत ट्रस्टच्या माध्यमातून दत्तमंदिरात पायी पालखी परिक्रमा उत्सव, दर गुरुवारी अन्नदान, पंढरपूर, गाणगापूर, गोंदिवलेकर महाराजांच्या पावनभूमीत अन्नदान करण्यात आले आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अन्नदानाचा घेतलेला वसा असाच अखंडित सुरू राहणार असल्याचे मोरे यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थांच्या मठात अन्नछत्र ट्रस्टच्या माध्यमातून रविवारी पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत प्रसादाचे वाटप करण्यात येणार असून दुपारी महाप्रसादाचे दिला जाईल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे अध्यक्ष सागर कुंड व अन्य सदस्य मेहनत घेत आहेत.

# हिरवळ महाविद्यालयाची अण्णासाहेब सावंत सहकारी बँकेस शैक्षणिक भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआयटी)ने शैक्षणिक उपक्रम म्हणून अण्णासाहेब सावंत सहकारी बँकेमध्ये मंगळवारी (दि.१६) शैक्षणिक भेटीचे आयोजन केले होते. डेप्युटी जनरल मॅनेजर संदीप शेलार यांनी, कर्ज विभाग, क्रेडिटेबिलिटी, डिपॉझिट विभाग आणि गोल्ड लोन प्रक्रिया आणि त्यांचे संबंधित नियम यांसारख्या आवश्यक व महत्त्वाच्या विभागांबद्दल माहिती दिली.



डेप्युटी जनरल मॅनेजर विश्वजीत केंदकी यांनी बँकेच्या एटीएम, आरटीजीएस, क्रेडिट कार्ड, ऑनलाईन बँकिंग, एनईफटी, पासबुक प्रिंटिंग तंत्रज्ञान अश्या अनेक सुविधांबाबत माहिती सांगितली. आजच्या बँकिंग क्षेत्रात डिजिटल साक्षरतेचे महत्त्व ओळखून, डेप्युटी जनरल मॅनेजर संतोष साळुंखे यांनी ऑनलाईन पेमेंट प्रणालीचे महत्त्व आणि ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठीच्या उपायांवरही भाष्य केले. विद्यार्थ्यांना सुरक्षित ऑनलाइन बँकिंग पद्धतींबद्दल माहिती उपलब्ध करून देण्यात आली. ऑनलाईन फसवणूक कशी ओळखावी व त्या संबंधी बँकेकडे तक्रार कशी करावी व त्याची दखल व कायदे याची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. या भेटीला आणखी समृद्ध करताना अण्णासाहेब सावंत सहकारी बँकेचे जनरल मॅनेजर जगदीश कुलकर्णी यांनी कर विभाग, विविध आर्थिक गुणोत्तरांची देखभाल आणि बँकेने अनुसरलेली लेखाविषयक धोरणे याविषयी सविस्तर माहिती दिली.

अण्णासाहेब सावंत सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत ओजाळे यांनी बँकेच्या वार्षिक अहवालातील नोंदी कशा केल्या जातात आणि बँकेतील प्रशासकीय संरचना आणि त्याचे नियंत्रण यावर माहिती दिली. त्यांनी संचालक मंडळाच्या भूमिका, बँकिंग नियम आणि कायदे आणि बँकेचे विविध प्रकारचे लेखापरीक्षण आणि तपासणी यावर चर्चा केली.

# वडगाव शाळेत विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा

**चौक : प्रतिनिधी**

बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि. पाताळगंगा या कंपनीच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या वडगाव शाळेत विद्यार्थ्यांची दंत चिकित्सा करण्यात आली. शाळेतील एकूण ९६ विद्यार्थ्यांचे दात तपासून त्यांना दात घासण्याचे किट भेट देण्यात आले.

या शिबिरासाठी बिर्ला कार्बन इंडिया कंपनीचे डॉ. रावत, गायकवाड व एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. रफिक नालबंद व त्यांच्या गटाने दंतचिकित्सा करून विद्यार्थ्यांना टूथ ब्रश, टूथ पेस्ट, घासणी असा किट दिला.

या वेळी बोलताना मुख्याध्यापक सुभाष राठोड म्हणाले की, मुलांच्या आरोग्याची नियमित काळजी घेणे आवश्यक आहे. बिर्ला कार्बन इंडिया कंपनीने आमच्या विद्यार्थ्यांसाठी दंत चिकित्सा शिबिर आयोजित करून विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. शाळेच्या वतीने त्यांना धन्यवाद देत आहे. भविष्यात सर्व विद्यार्थ्यांचे शारीरिक तपासणी शिबिर घेण्यात येईल, असे आश्वासन डॉ. रफिक नालबंद यांनी दिले.



# मध्य रेल्वेची गणेशभक्तांसाठी भेट


## तब्बल २०२ गणपती स्पेशल ट्रेन चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

आगामी गणपती महोत्सवादरम्यान गणेशभक्तांसाठी मध्य रेल्वे २०२ गणपती विशेष गाड्या चालवणार आहे. त्यामुळे त्यांचा प्रवास सुकर होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सावंतवाडी रोड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैनदिन विशेष (३६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११५१ विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज ००.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १४.२० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहचेल. गाडी क्रमांक ११५२ विशेष १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) पर्यंत दररोज १५.१० वाजता सावंतवाडी रोड येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ४.३५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ हे थांबे देण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-रत्नागिरी-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैनंदिन विशेष (३६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११५३ विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या)पर्यंत दररोज ११.३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २०.१० वाजता रत्नागिरी येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११५४ विशेष रत्नागिरी येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज ४ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १३.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड हे थांबे देण्यात आले आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस-कुडाळ-लोकमान्य टिळक टर्मिनस दैनंदिन विशेष (३६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११६७ विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज २१ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ९.३० वाजता कुडाळ येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११६८ विशेष कुडाळ येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज १२ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ००.४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. गाडी क्रमांक ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर (फक्त ०११६८ अपसाठी), खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड (फक्त ०११६८ अपसाठी), संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे (फक्त ०११६८ अपसाठी), राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव (फक्त ०११६८ अपसाठी), कणकवली आणि सिंधुदुर्ग हे थांबे देण्यात आले आहेत.



लोकमान्य टिळक टर्मिनस-सावंतवाडी रोड-लोकमान्य टिळक टर्मिनस दैनंदिन विशेष (३६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११७१ विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज ८.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २१ वाजता सावंतवाडी रोड येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११७२ विशेष सावंतवाडी रोड येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) दररोज २२.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १०.४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीला ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ हे थांबे देण्यात आले आहेत.

लोकमान्य टिळक टर्मिनस-कुडाळ-लोकमान्य टिळक टर्मिनस त्रि-साप्ताहिक विशेष (१६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११८५ विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर सोमवार, बुधवार आणि शनिवार २ ते १८ सप्टेंबर (८ फेऱ्या)दरम्यान ००.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १२.३० वाजता कुडाळ येथे पोहचेल गाडी क्रमांक ०११८६ विशेष कुडाळ येथून २ ते १८ सप्टेंबर (८ फेऱ्या) दर सोमवार, बुधवार आणि शनिवारी १६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ४.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीला ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर (फक्त ०११८६ अपसाठी), खेड, चिपळूण, सावर्डा (फक्त ०११८६ अपसाठी), आरवली रोड (फक्त ०११८६ अपसाठी), संगमेश्वर रोड, साठी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव (फक्त ०११८६ अपसाठी), कणकवली आणि सिंधुदुर्ग हे थांबे देण्यात आले आहेत.

लोकमान्य टिळक टर्मिनस-कुडाळ- लोकमान्य टिळक टर्मिनस वातानुकूलित साप्ताहिक विशेष (६ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११६५ विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर मंगळवारी ३, १० आणि १७ सप्टेंबर (३ फेऱ्या) रोजी ००.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १२.३० वाजता कुडाळ येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११६६ विशेष प्रत्येक मंगळवारी ३, १० आणि १७ सप्टेंबर (३ फेऱ्या) रोजी कुडाळ येथून १६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०४.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीला ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर (फक्त ०११६६ अपसाठी), खेड, चिपळूण, सावर्डा (फक्त ०११६६ अपसाठी), आरवली रोड (फक्त ०११६६ अपसाठी), संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव (फक्त ०११६६ अपसाठी) कणकवली आणि सिंधुदुर्ग हे थांबे देण्यात आले आहेत.

दिवा-चिपळूण-दिवा मेमू दैनंदिन अनारक्षित विशेष (३६ फेऱ्या) ०११५५ मेमू विशेष दिवा येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) ०७.१५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १४ वाजता चिपळूण येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११५६ मेमू विशेष चिपळूण येथून १ ते १८ सप्टेंबर (१८ फेऱ्या) १५.३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २२.५० वाजता दिवा येथे पोहचेल. या गाडीला निळजे, तळोजा पंचानंद, कळंबोली, पनवेल, सोमाटणे, रसायनी, आपटा, जिते, हमरापूर, पेण, कासू, नागोठणे, निडी, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सप्पे वामणे, करंजाडी, विन्हेरे, देवाणखाऊ, कळंबणी, खेड आणि अंजनी हे थांबे देण्यात आले आहेत. ट्रेन क्र. २२११९/२२१२० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-करमाळी-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तेजस एक्स्प्रेस आणि ट्रेन क्र. १२२२९/१२२३० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-मडगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत या गाड्यांचे बुकिंग, पावसाळ्यात वेळापत्रकात बदल झाल्यामुळे बंद करण्यात आले होते, ते २१ जुलैपासून पुन्हा सुरू होणार आहे.

### आरक्षण अन् ॲपसेवा

**गणपती विशेष गाड्यांच्या आरक्षणासाठी गणपती विशेष ट्रेन क्रमांक ०११५१, ०११५२, ०११५३, ०११६८, ०११७१, ०११७२, ०११८५, ०११६५ आणि ०११६६चे बुकिंग सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर विशेष शुल्कासह २१.०७.२०२४ पासून उघडले जाईल. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार थांबण्याच्या वेळेसाठी कृपया ु. शपीिंळी.ळपवळरपीरळश्र.सेीं. ळपला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# भारतीय महिला संघाची विजयी सलामी

## आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानवर मात

**दांबुला : वृत्तसंस्था**

महिला आशिया चषक टी-२० स्पर्धेतील भारताने आपल्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा दारुण पराभव केला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सात गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यादरम्यान पाकिस्तानचा संघ १०८ धावांवर गडगडला. प्रत्युत्तरात स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने विजयाची नोंद केली. भारताकडून गोलंदाजांनीही चमकदार कामगिरी केली. दीप्ती शर्माने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.



भारताने महिला आशिया चषक स्पर्धेत विजयाने आपल्या मोहिमेची सुरुवात केली आहे. आशिया चषकाचा दुसरा सामना शुक्रवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात दांबुला येथील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि १९.२ षटकात १० गडी गमावून १०८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारतीय संघाने १४.१ षटकांत तीन गडी गमावून १०९ धावा केल्या आणि सामना सात विकेट्सने जिंकला. या विजयासह भारत अ गटातील गुणतालिकेत दोन गुणांसह पहिल्या स्थानावर पोहचला आहे.

भारताच्या विजयात संघाच्या स्मृती मानधना आणि शफाली वर्मा या सलामीच्या जोडीने महत्त्वाची भूमिका बजावली. दोघींमध्ये पहिल्या विकेटसाठी ८५ धावांची भागीदारी झाली. भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती ३१ चेंडूंत ४५ धावा करून बाद झाली. यादरम्यान तिने नऊ चौकार मारले, तर शेफाली २९ चेंडूंत ४० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. यादरम्यान तिने सहा चौकार आणि एक षटकार लगावला. त्याचवेळी दयालन हेमलथा १४ धावा करून बाद झाली. या सामन्यात हरमनप्रीत कौर पाच धावा केल्यानंतर नाबाद राहिली आणि जेमिमा रॉड्रिग्स तीन धावा केल्यानंतर नाबाद राहिली.

तत्पूर्वी भारतीय संघाने पाकिस्तानला १०८ धावांवर ऑलआउट केले. निदा दारच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाकडून अमीनने सर्वाधिक २५ धावा केल्या. तिने ३५ चेंडूंचा सामना करीत ३ चौकार मारत २२ धावांची खेळी केली. फातिमा सनाने १६ चेंडूंचा सामना करताना नाबाद २२ धावा केल्या. सनाने एक चौकार आणि दोन षटकार मारले. हसनने १९ चेंडूंचा सामना करताना २२ धावा केल्या. तिने तीन चौकार मारले.

भारतीय गोलंदाजांची या सामन्यात चमकदार कामगिरी पहायला मिळाली. दीप्ती शर्माने चार षटकात २० धावा देत तीन विकेट्स घेतल्या, तर रेणुका सिंग, श्रेयंका पाटील आणि पूजा वस्त्राकार यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# जपानची स्टार जिम्नॅस्टिक शोको मियाता पॅरिस ऑलिम्पिकमधून बाहेर

**टोकियो : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेला २६ जुलैपासून सुरुवात होत आहे. त्याआधी जपान या देशाला मोठा धक्का बसला आहे. महिला कलात्मक जिम्नॅस्टिक संघाची १९ वर्षीय कर्णधार शोको मियाता हिने आपले नाव स्पर्धेतून माघारी घेतले आहे. याबाबत जपानी जिम्नॅस्टिक असोसिएशनने (जेजीए) आपल्या निवेदनात म्हटले आहे की, तिने धूम्रपान करून संघाच्या आचारसंहितेचे उल्लंघन केले होते. यानंतर आता तिने आपले नाव मागे घेतले.

याबाबत जेजीए अधिकाऱ्यांनी सांगितले की, मियाता चाचणीसाठी मोनाको येथील संघाच्या प्रशिक्षण शिबिरातून बाहेर पडल्यानंतर गुरुवारी जपानला पोहचली होती, ज्यामध्ये तिच्या धूम्रपानाची पुष्टी झाली होती. जेजीएने सांगितले की, आता पाचऐवजी केवळ चार खेळाडू स्पर्धेत सहभागी होतील.

जेजीएचे अध्यक्ष तादाशी फुजिता आणि त्यांचे वैयक्तिक प्रशिक्षक मुत्सुमी हरदा आणि इतर अधिकाऱ्यांनी मियाताच्या कृत्याबद्दल चाहत्यांची माफी मागितली आहे. ते म्हणाले, याबद्दल आम्ही मनापासून माफी मागतो. या वेळी जपानच्या महिला जिम्नॅस्टिक संघाकडून खूप अपेक्षा होत्या. १९६४च्या टोकियो ऑलिम्पिकनंतर ती पहिल्यांदाच जपानसाठी पदक जिंकेल अशी अपेक्षा होती.

### धूम्रपानामुळे पाठवण्यात आले मायदेशी



मियाता ही सध्याची जपानी राष्ट्रीय चॅम्पियन आहे. या वेळी ती पदकाची दावेदार मानली जात होती. तिने २०२२च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये बीमवर कांस्यपदक जिंकले होते. याशिवाय अष्टपैलू स्पर्धेत ती पाचव्या स्थानावर राहिली होती.

# ज्येष्ठ कबड्डी संघटक दिगंबर शिरवाडकर यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशचे माजी खजिनदार व ताडदेवच्या आर्य सेवा मंडळाचे आधारस्तंभ दिगंबर शिरवाडकर यांचे शनिवारी (दि. २०) पहाटे प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले. निधनासमयी ते ८७ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी त्यांच्या मुलाचे निधन झाले होते. त्या दुःखातून ते सावरले नाहीत तोच त्यांचा अंत झाला.



शिरवाडकर यांनी जवळपास दोन तप मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या खजिनदारपदाची जबाबदारी सांभाळली होती. कित्येक वर्ष ते मुंबई शहरचे सदस्यदेखील होते. काही काळ त्यांनी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचा जमाखर्च लिहिण्याची जबाबदारीदेखील पार पाडली होती. आर्य सेवा मंडळाची कबड्डी स्पर्धा सातत्याने आयोजित करण्यात वसंत भालेकर यांच्या बरोबरीने शिरवाडकर यांचेही योगदान महत्त्वाचे होते. भालेकर यांच्या निधनानंतर काही वर्ष शिरवाडकर यांनी या स्पर्धा आयोजनाची जबाबदारी एकाकी पार पाडली.

शिरवाडकर यांनी शारीरिक शिक्षण मंडळापासून त्यांनी कबड्डी क्षेत्रात आपल्या कार्याला सुरुवात केली. आज त्या कार्याचा शेवट झाला. गिरगाव येथील चंदनवाडी स्मशानभूमी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बुद्धीबळ स्पर्धेत आरव, समीर, अनंत, आस्यची विजयी दौड

**मुंबई** : आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिनानिमित्त सुरू झालेल्या स्व. मंगला आनंदराव अडसूळ स्मृतीचषक ८, १०, १२ वर्षाखालील शालेय मुला-मुलींच्या बुद्धीबळ स्पर्धेत आरव जतानिया, समीर नाडकर्णी, अनंत काब्रा, आस्य चव्हाण, खुश मोकारीया, मल्हार कोटे आदींनी विजयी दौड केली.

स्पर्धेचे उद्घाटन को-ऑपरेटीव्ह बँक एम्पलॉईज युनियन मुंबईचे अध्यक्ष व माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांच्या हस्ते झाले. युनियनचे सरचिटणीस नरेंद्र सावंत, खजिनदार प्रमोद पार्टे, हशम धामस्कर, प्रकाश वाघमारे, भार्गव धारगळकर, जनार्दन मोरे, अशोक नवले आदी उपस्थित होते.

स्पर्धेत मुंबई शहर-उपनगर, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यातील ६४ सबज्युनिअर खेळाडूंमध्ये चुरशीच्या लढती होत आहेत.

# टी-२० संघाचा कर्णधार बनल्यावर सूर्याचा जुना व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय निवड समितीने सूर्यकुमार यादवला नवी जबाबदारी देत त्याला भारतीय टी-२० संघाचा नवा कर्णधार बनवले आहे. हार्दिकच्या फिटनेस समस्येमुळे त्याच्याऐवजी बीसीसीआयने नवा कर्णधार म्हणून सूर्यकुमारची निवड केली असल्याचे बोलले जात आहे. सूर्याला सर्वात लहान फॉरमॅटमध्ये संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केल्यानंतर त्याचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे.

स्टार स्पोर्ट्सने सोशल मीडियावर ही व्हिडीओ क्लिप शेअर केली आहे, ज्यामध्ये सूर्यकुमारने त्याच्या कर्णधार कौशल्याबद्दल सांगितले. हा व्हिडीओ २०२३मधला आहे, जेव्हा सूर्याने भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४-१ असा विजय मिळवून दिला होता.



त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सर्वात लहान फॉरमॅटमध्ये १-१ अशी बरोबरी साधली होती.

तेव्हा सूर्या म्हणाला होता की, मी या नव्या भूमिकेचा आनंद घेत आहे. मी सर्वांसोबत वेळ घालवण्याचा आनंद घेत आहे. आम्ही सर्वांनी खूप फ्रँचायझी आणि देशांतर्गत क्रिकेट खेळले आहे. त्यामुळे त्यांची ताकद आणि कमकुवतपणा समजून घेणे कठीण नाही. आम्ही मैदानाबाहेरही बराच वेळ घालवतो, त्यामुळे मैदानावर आमचा समन्वय चांगला असतो.

या व्हिडीओत सूर्या पुढे म्हणाला होता की, माझ्यासाठी गोष्टी सोप्या ठेवणे महत्त्वाचे आहे. मी प्रक्रियेवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. मला गोष्टी सोप्या ठेवायला आवडतात आणि मी तसा प्रयत्न करतो. त्याचबरोबर प्रत्येकाला सांगतो की गोष्टी खरोखर सोप्या ठेवण्याचा प्रयत्न करा. जास्त काही करण्याचा प्रयत्न करू नका आणि स्वतःला इतरांपेक्षा वेगळे दाखवण्याचा प्रयत्न करू नका.

# पदार्पणाची ऑलिम्पिक स्पर्धा स्वप्नवत करण्यासाठी उत्सुक -हॉकीपटू सुखजित


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सहा वर्षांपूर्वी पाठीच्या दुखापतीमुळे उजव्या पायाला पक्षाघात झाल्याने हॉकीपटू सुखजित सिंगला बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागले, मात्र आयुष्यातील हा सर्वांत कठीण काळ मागे सारून सुखजित ठामपणे उभा राहिला आणि यंदा पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत तो भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. यात दमदार कामगिरी करून भारताला यश मिळवून देत पदार्पणाची ऑलिम्पिक स्पर्धा स्वप्नवत करण्याचा सुखजितचा मानस आहे.

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेला २६ जुलैपासून सुरुवात होणार असून यात भारतीय पुरुष हॉकी संघाला पदकासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. या संदर्भात २८ वर्षीय कर्णधार सुखजितने 'हॉकी इंडिया'च्या निवेदनात म्हटलेय की, ऑलिम्पिकमध्ये खेळणे हे माझे आणि माझ्या कुटुंबीयांचे स्वप्न होते. कोणत्याही खेळाडूच्या कारकीर्दीतील ही सर्वात मोठी स्पर्धा असते. ऑलिम्पिकमध्ये खेळण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. सुखजितने २०२२मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. आता ऑलिम्पिकमध्ये तो भारतासाठी महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे.

पाठीच्या दुखापतीमुळे काही काळासाठी त्याच्या पायाला पक्षाघात झाला. हा आपल्या आयुष्यातील सर्वांत अवघड काळ होता असे सुखजित सांगतो. जवळपास पाच महिने मी अंथरुणाला खिळून होतो. या परिस्थितीशी जुळवून घेणे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप अवघड गेले. हॉकी खेळणे दूरच, मला चालताही येत नव्हते. त्यामुळे देशासाठी हॉकी खेळण्याचे स्वप्न दिवसागणिक दूर जात असल्याची भावना होती, परंतु कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे मी पुन्हा उभा राहू शकलो. विशेषत: माझ्या वडिलांनी कधीही आशा सोडली नाही. त्यांच्यामुळेच मी भारतासाठी हॉकी खेळण्याचे स्वप्न पूर्ण करू शकलो, असे सुखजितने नमूद केले.

माझी मेहनत आणि समर्पण याचे फळ मला मिळाले आहे. भारतीय संघाला माझ्याकडून काही अपेक्षा आहेत. त्या अपेक्षा पूर्ण करण्याचा आणि संघातील माझी भूमिका चोख पार पाडण्याचा माझा प्रयत्न असेल. पॅरिसमध्ये माझे सर्वस्व देऊन माझ्या प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांच्या विश्वासाची परतफेड करण्याचा निर्धार असल्याचे सुखजितने म्हटले आहे.



### परंपरा आणि वाटचाल

जालंधर येथे जन्मलेल्या सुखजितने वयाच्या सहाव्या वर्षापासून हॉकी खेळण्यास सुरुवात केली. त्याला वडिलांकडूनच ही प्रेरणा मिळाली. त्याचे वडील अजित सिंग पंजाब पोलिसांकडून हॉकी खेळायचे. कमी वयातच हॉकी खेळण्यास सुरुवात करूनही भारतीय संघापर्यंत पोहचण्यासाठी सुखजितला बराच काळ वाट पाहावी लागली. २०१८मध्ये त्याची भारताच्या सिनिअर संघाच्या संभाव्य खेळाडूंच्या शिबिरासाठी निवड झाली होती, मात्र पाठीच्या दुखापतीमुळे काही काळासाठी त्याच्या पायाला पक्षाघात झाला. त्यामुळे भारताकडून खेळण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याला आणखी काही वर्षे वाट पहावी लागली.

# रिझवानची धोनीसोबत तुलना केल्याने हरभजनची सटकली!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे चाहते त्यांच्या संघातील खेळाडूंप्रमाणे कधी काय करतील याची कल्पना नसते. एखाद्या संघाने पाकिस्तानच्या तोंडचा घास पळवल्यानंतर पाकिस्तानी चाहते भन्नाट प्रतिक्रिया देत असतात. हा जणू काही कॉमेडी शो असतो. आता पाकिस्तानातील एका क्रीडा पत्रकाराने हद्दच ओलांडली. त्याने चक्क यष्टीरक्षक मोहम्मद रिझवानची तुलना भारतीय संघाचा माजी कर्णधार, दिग्गज,



कॅप्टन कूल महेंद्रसिंह धोनीसोबत केली. ही पोस्ट पाहताच भारताचा माजी खेळाडू हरभजन सिंगने संतप्त प्रतिक्रिया दिली.

पाकिस्तानच्या पत्रकाराने सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळावी या हेतूने हे कृत्य केल्याचे दिसते, कारण तो त्याच्यावर कितीही टीका झाली तरी वारंवार काहीही पोस्ट करून भारतीय चाहत्यांचे लक्ष वेधत असतो. भारतीय चाहते अथवा एखाद्या माजी खेळाडूने यावर प्रतिक्रिया दिल्यास त्याला प्रसिद्धी मिळून जाते, पण आता त्याने केलेल्या या पोस्टने भज्जीची मात्र सटकली.

पाकिस्तानातील पत्रकाराच्या पोस्टवर व्यक्त होताना हरभजनने म्हटले की, हल्ली तू कोणती नशा करतोस? हा किती मूर्खपणाचा प्रश्न आहे. मित्रांनो याला सांगा. धोनी रिझवानपेक्षा खूप पुढे आहे आणि जर तुम्ही रिझवानला हा प्रश्न विचाराल तर तोदेखील तुम्हाला चोख उत्तर देईल. मला रिझवान आवडतो, तो खूप चांगला खेळाडू आहे आणि नेहमी संघाला विजय मिळवून देण्यासाठी खेळतो, पण ही तुलना पूर्णपणे चुकीची आहे. आजच्या युगातही धोनी अव्वल क्रमांकावर आहे.

# सानियासोबत लग्नाच्या अफवांवर शमी भडकला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि टेनिस स्टार सानिया मिर्झा लग्न करणार असल्याची चर्चा रंगली असतानाच शमीने त्यावर भाष्य केले. खरेतर अनेकांनी सानिया आणि शमी यांचे फोटो एडिट करून व्हायरल केले होते. यावर सानियाच्या वडिलांनीही प्रतिक्रिया दिली होती. आता खुद्द शमीने याबद्दल भाष्य करताना संतप्त प्रतिक्रिया दिली.

मीम्स बनवणाऱ्या मंडळींनी जर विचार करायला हवा. एखाद्याच्या जीवनावर याचा किती परिणाम होऊ शकतो याची कल्पना त्यांना नसते, असे शमीने म्हटले आहे.

एका पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत बोलताना शमीने विविध मुद्द्यांवर भाष्य केले. तो म्हणाला की, हे मीम्स कोणाच्या तरी वैयक्तिक आयुष्याशी निगडीत असू शकतात. त्यामुळे व्हायरल करणाऱ्यांनी ते विचारपूर्वक करावेत. ज्यांचे पेज व्हेरिफाय केलेले नाहीत ते लोक असे बोलू शकतात. मी आव्हान देतो की, त्यांच्यात हिंमत असेल तर एक व्हेरिफाईड पेज बनवा आणि असे फोटो शेअर करून दाखवा. दुसऱ्या व्यक्तीला खड्ड्यात ढकलणे सोपे असते, मात्र असे न करता त्या लोकांनी स्वतः यश मिळवण्याचा विचार केला पाहिजे. या लोकांना इतरांचे पाय खेचण्यात खूप आनंद वाटतो, पण मी त्यांना सांगू इच्छितो की त्यांनी त्यांच्या कुटुंबाचा आधार बनून चार लोकांचे चांगले भविष्य करावे. जर तुम्ही दुसऱ्याला मदत केलीत तर तुम्ही एक चांगला माणूस आहात हे मी स्वीकारेन.

"Visit Hirwal Education Trust first before exploring other options for your educational needs.
HIRWAL EDUCATION TRUST
ADMISSIONS OPEN 2024-2025
Degree Colleges Affiliated to University of Mumbai
COLLEGE OF SCIENCE
[ COMPUTER SCIENCE & INFORMATION TECHNOLOGY ]
(NAAC Accredited with 'B' Grade)
HIRWAL RATRA MAHAVIDYALAYA
HIRWAL LAW COLLEGE
L.L.B. (5 YEARS) B.Sc.IT B.Sc.CS
B.M.S. B.Sc. B.Com
Our USP
• Pioneering Law College in Mahad • Industrial Placement Assistance
• Well equipped classrooms • Skill Development Courses
• State-of-the-art Science labs • Scholarship Facility
• State-of-the-art computer labs • Personal Counseling
Website: www.hirwaleducationtrust.com
Address : Hirwal Education Trust Campus, Mumbai-Goa Highway, Behind Dharia Petrol Pump, Mahad-Raigad. 402301
Contact No.
9011768522 | 7276790213
8308379867
Enroll Now

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com